७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०३४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## एसटीच्या प्रत्येक इंधन पंपावर आता भविष्याची 'चार्जिंग'

मुंबई (दै. संध्या) : बदलत्या काळाची चाहूल ओळखत आणि पर्यावरणपूरक भविष्यासाठी ठोस पाऊल टाकत, राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी एसटीच्या जागेवर उभारल्या जाणाऱ्या किरकोळ इंधन विक्री केंद्रांवर ईव्ही (इलेक्ट्रिक वाहन) चार्जिंग स्थानकांना प्राधान्य देण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश दिले. मंत्रालयातील आपल्या दालनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, संबंधित वरिष्ठ अधिकारी तसेच विविध इंधन कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, "भारत 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, वाहतूक व्यवस्थेतही हरित क्रांती घडवून आणणे अत्यावश्यक आहे. भविष्यातील प्रवास हा इलेक्ट्रिक ऊर्जेवर आधारित असेल, आणि एसटी महामंडळ त्यासाठी आजपासूनच पायाभूत सुविधा उभारण्यास कटिबद्ध आहे."

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### खरेदी विक्रीवरील मुद्रांक शुल्क माफ

मुंबई (दै. संध्या) : शत्रू मालमत्तेच्या खरेदी-विक्रीवरील मुद्रांक शुल्क प्रथम नोंदणी करताना माफ करण्यास आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यात एकूण ४२८ शत्रू मालमत्ता आहेत.यामध्ये छत्रपती संभाजी नगर-२, जालना -२, मुंबई-६२, मुंबई उपनगर-१७७, नागपूर-६, पालघर-७७, पुणे-४, रत्नागिरी -११, सिंधुदुर्ग-१, ठाणे-८६. युध्दकाळात भारत सोडून शत्रू देशात स्थलांतरित झालेल्या नागरिकांच्या मालमत्ता यांचा सामावेश आहे.

#### भाडेपट्टीचा कालावधी वाढविणार

मुंबई (दै. संध्या) : महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतुदी अन्वये शासकीय जमीन विविध कारणांसाठी ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्यात येतात. त्यांचा कालावधी पुढे ४९ वर्षांपर्यंत वाढवण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये शासनाच्या विविध प्रशासकीय विभागाच्या मालकीच्या अथवा महसूल विभागाने विशिष्ट प्रयोजनासाठी त्या विभागाकडे हस्तांतरीत केलेल्या तसेच त्यांच्या अख्यत्यारितील महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांच्या मालकीच्या अथवा हस्तांतरित केलेल्या शासकीय जमिनी महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांचा समावेश आहे.

#### विभागाच्या देयकांसाठी ट्रेड प्लॅटफॉर्म

मुंबई (दै. संध्या) : सार्वजनिक बांधकाम विभागामधील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक, कंत्राटदारांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी ट्रेड प्लॅटफॉर्मचा अवलंब करण्यास आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील सर्वच विभागांनी ट्रेड प्लॅटफॉर्मचा अवलंब करावा. प्रत्येक विभागाने आपल्या विभागाच्या कार्यपध्दतीशी आणि कामकाजाच्या आवश्यकतेनुसार आदर्श कार्य प्रणाली निश्चित करावी. त्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

# गिरीश महाजन यांच्या अडचणी वाढल्या

## दिलगिरी व्यक्त करताना म्हणाले- मी गावात पंगत देतो, त्यांच्यासोबत जेवायला बसतो; नव्या वादाला सुरुवात

**मुंबई (दै. संध्या)**



नाशिकमधील प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख न केल्याने निर्माण झालेला वाद शांत होण्याऐवजी अधिकच पेटताना दिसत आहे. या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना मंत्री गिरीश महाजन यांनी, मी गावात पंगत देतो, त्यांच्यासोबत जेवायला बसतो, 40 वर्षांत अंगात निळा शर्ट घातला नाही असं कधी झालंय का? असे वक्तव्य केल्याने नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. दिलगिरी व्यक्त करूनही अशा विधानांमुळे समाजात संभ्रम आणि संताप वाढत असून, महाजनांच्या या वक्तव्यावरून राजकीय व सामाजिक वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

नाशिकमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शासकीय कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांच्या भाषणामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. या कार्यक्रमात भाषण करताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेतल्याने उपस्थितांमध्ये असंतोष निर्माण झाला. विशेष म्हणजे, कार्यक्रमस्थळी उपस्थित असलेल्या एका महिला वन अधिकाऱ्याने थेट जाहीरपणे आक्षेप घेत संविधान निर्मात्यांचे नाव कसे विसरलात? असा सवाल केल्याने वातावरण काही काळ तणावपूर्ण बनले. या घटनेचे पडसाद आता नाशिकपुरते मर्यादित न राहता राज्यभर उमटू लागले असून, राजकीय आणि सामाजिक वर्तुळात यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

या घटनेनंतर मंत्री गिरीश महाजन यांच्याविरोधात पोलिस तक्रार दाखल करण्यात आली आहे. वन विभागाच्या कर्मचारी माधवी जाधव आणि दर्शना सौपुरे यांनी भाषणादरम्यान बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख न केल्याबाबत जाहीरपणे आक्षेप नोंदवला. त्यांच्या या कृतीमुळे कार्यक्रमात गोंधळ उडाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केला आणि दोन्ही महिला कर्मचाऱ्यांना ताब्यात घेऊन सरकारवाडा पोलिस ठाण्यात नेण्यात आले. या कारवाईनंतर नागरिक आणि विविध संघटनांनी पोलिस ठाण्याबाहेर एकत्र येत मंत्री महाजन यांच्याविरोधात घोषणाबाजी केली आणि गुन्हा दाखल करण्याची मागणी लावून धरली.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांनी या घटनेला गंभीर स्वरूप देत महाजन यांच्यावर अॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नव्हे तर संपूर्ण देशाच्या संविधानाचे शिल्पकार आहेत. अशा महामानवाचा उल्लेख टाळला जाणे हे अपमानास्पद असल्याचे त्यांनी म्हटले. या मागणीनंतर राजकीय वातावरण अधिक तापले असून, महाजन यांची अडचण वाढल्याचे चित्र आहे. दरम्यान, वाढत्या वादाच्या पार्श्वभूमीवर मंत्री गिरीश महाजन यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, मला आज खूप वाईट वाटले आहे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीमध्ये मी नेहमीच पुढाकार घेतो. अनेक नेते हार घालून निघून जातात, पण मी आमच्या गावात आणि तालुक्यात जयंती कार्यक्रमात उपस्थित राहतो. त्यांनी पुढे सांगितले की, गेल्या चाळीस वर्षांत त्यांनी कधीही बाबासाहेबांचा अपमान होईल असे वर्तन केलेले नाही.

### सामाजिक आणि राजकीय वादाचे रूप

एकीकडे गिरीश महाजन यांनी दिलगिरी व्यक्त करून प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्यांच्या वक्तव्यावर आणि भूमिकेवर विरोधकांकडून टीकेची झोड उठत आहे. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख प्रजासत्ताक दिनाच्या भाषणात न होणे ही केवळ चूक नसून ती मानसिकतेचे प्रतीक असल्याचा आरोप काही संघटनांनी केला आहे. त्यामुळे हे प्रकरण केवळ एका कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, सामाजिक आणि राजकीय वादाचे रूप घेत असल्याचे स्पष्ट होत आहे. येत्या काळात या प्रकरणात पोलिस आणि प्रशासन काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## आता ZP निवडणुकीनंतर शिवसेना खटल्याची सुनावणी

**नवी दिल्ली (दै. संध्या)**




महाराष्ट्रासह अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष व धनुष्यबाण प्रकरणाच्या सुनावणीसाठी आता सर्वोच्च न्यायालयाने आता 18 फेब्रुवारी ही नवी तारीख दिली आहे. त्यामुळे आता या प्रकरणावर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीनंतरच सुनावणी होईल हे स्पष्ट झाले आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वातील खंडपीठाने शिवसेनेची सुनावणी 21 व 22 जानेवारी रोजी सलग 2 दिवस घेण्याचे निश्चित केले होते. पण 21 तारखेला सुप्रीम कोर्टाने ऐनवेळी अरावली पर्वताचे प्रकरण हातावर घेतल्यामुळे या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही. त्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी 23 जानेवारी रोजी होईल असे सांगण्यात येत होते. पण त्या दिवशीही हे प्रकरण बोर्डावर आले नाही. अखेर आज सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण 18 फेब्रुवारी रोजी सुनावणीसाठी हाती घेतले जाईल हे स्पष्ट केले आहे. सुप्रीम कोर्टाच्या संकेतस्थळावर ही तारीख नमूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रात सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या प्रकरणाची सुनावणी ही निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्याअगोदर घेण्याची मागणी केली होती.

## मराठा कुणबी जात प्रमाणपत्र; कार्यवाहीत गती

**मुंबई (दै. संध्या)**




मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने हैदराबाद गॅझेटिअरच्या संदर्भात सप्टेंबर २०२५ मध्ये जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानंतर मराठवाडा महसूल विभागातील आठही जिल्ह्यांत प्रमाणपत्रांसाठी अर्ज प्राप्त होत असून, हे अर्ज प्रलंबित राहू नयेत यासाठी कार्यवाहीस गती देण्यात यावी, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. या उद्देशाने गावपातळी पर्यंत जाऊन शासकीय यंत्रणेने सक्रियपणे प्रयत्न करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मंत्रालयात जलसंपदा मंत्री तथा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष श्री. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण उपसमितीच्या झालेल्या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, माजी न्यायमूर्ती संभाजी शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव गणेश पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज, उपसमितीचे सदस्य, विविध विभागांचे सचिव व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. यावेळी मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, उपसमिती तसेच माजी न्यायमूर्ती श्री. संभाजी शिंदे यांनी दिलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र वितरणातील अडथळे दूर करावेत. मराठा कुणबी जात दाखले व वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने स्पष्ट आदेश दिले असून, हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी, जिल्हा प्रशासनामार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीचा नियमित आढावा विभागीय आयुक्तांनी घ्यावा,असेही त्यांनी सांगितले.

## मुंबई-नवी मुंबई विमानतळ मेट्रोला हिरवा कंदील

**मुंबई (दै. संध्या)**

- ३५ किमी लांबीच्या मेट्रो लाईन ८ ला मंजुरी
- ९.२५ किमी लांबीचा मेट्रो लाईन ८, ६ भूमिगत आणि १४ उन्नत मार्ग
- एकूण २० स्थानके, ज्यामध्ये ६ भूमिगत आणि १४ उन्नत स्थानके आहेत



मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांच्यातील थेट मेट्रो जोडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत दोन्ही विमानतळांना जोडणाऱ्या ३५ किमी लांबीच्या मेट्रो ८ लाईनला मंजुरी देण्यात आली.हा मार्ग साडेतीन ते पाच वर्षात पुर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या मेट्रो प्रकल्पाची एकूण लांबी ३५ किलोमीटर असेल, ज्यामध्ये ९.२५ किलोमीटर भूमिगत आणि २४.६३६ किलोमीटर उन्नत स्थानके समाविष्ट आहेत. मेट्रो लाईनमध्ये एकूण २० स्थानके असतील, ज्यामध्ये ६ भूमिगत आणि १४ उन्नत स्थानके असतील. मेट्रो छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल - २ ते घाटकोपर (पूर्व) पर्यंत भूमिगत धावेल, तर घाटकोपर (पश्चिम) ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल - २ पर्यंतचा उन्नत मार्ग १.९ किलोमीटर असेल. दोन स्थानकांमधील सरासरी अंतर १.९ किलोमीटर असेल.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की या प्रकल्पासाठी ३०.७ हेक्टर जमीन संपादित करावी लागेल, ज्याची किंमत अंदाजे ₹ ३८८ कोटी असेल. संपूर्ण प्रकल्पाची अंदाजे किंमत ₹ २२,८६२ कोटी आहे. मेट्रो प्रकल्प पीपीपी (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) मॉडेलवर विकसित केला जाईल, ज्यामध्ये प्रकल्पातील २० टक्के वाटा केंद्र सरकारकडून, २० टक्के राज्य सरकारकडून आणि उर्वरित वाटा पीपीपी ऑपरेटरकडून येईल. हा प्रकल्प साधारणपणे पाच वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजित आहे, परंतु सरकारने तो तीन वर्षांत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. ही मेट्रो लाईन कुर्ल्यातील लोकमान्य टिळक टर्मिनससह अनेक महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांना जोडेल. यात इतर तीन मेट्रो लाईन्सशी इंटरचेंज देखील असतील, त्यामुळे प्रवाशांना लक्षणीय सुविधा मिळेल.

## माथेफिरूने ट्यूशनला जाणाऱ्या २ मुलींना विहिरीत फेकले

**जळगाव (दै. संध्या)**

- जळगाव जिल्ह्यातील भयंकर घटना; जुना वाद, एकतर्फी प्रेम की विकृती?

एका माथेफिरू तरुणाने खासगी शिकवणीला जाणाऱ्या 2 अल्पवयीन विद्यार्थिनींना विहिरीत फेकून दिल्याची भयंकर घटना जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात घडली आहे. सदर तरुणाने या मुलींना विहिरीत का फेकले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण पोलिसांनी आरोपी तरुणाला ताब्यात घेतले आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, भुसावळ तालुक्यातील साकरी गावात ही घटना घडली आहे. रोहन चौधरी असे आरोपी माथेफिरू तरुणाचे नाव आहे. पीडित मुली इयत्ता 9 वीच्या विद्यार्थिनी आहेत. त्या मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे गावातून खासगी शिकवणीसाठी जात होत्या. त्या गावाजवळील एका शेतालगत पोहोचल्या असता तिथे दबा धरून बसलेल्या आरोपीने या दोघींवर हल्ला केला. त्याने त्यांना पकडून एका विहिरीजवळ नेले. त्यानंतर त्यांना पकडून विहिरीत फेकून दिले. हा प्रकार घडत असताना मुलींनी जिवाच्या आकांताने आरडाओरडा केला. त्यांचा आरडाओरडा ऐकूण दुसऱ्या एका शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यानी हातातील काम सोडून त्यांच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी गावातही ही गोष्ट कळवली. त्यानंतर गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ मुलींना दोरखंड व शिडीच्या मदतीने विहिरीबाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला.

## अनावधानाने चूक, तर अनावधानाने मंत्रिपदही काढून टाका

### प्रकाश आंबेडकरांचा गिरीश महाजनांवर हल्लाबोल; वंचितची आक्रमक भूमिका

**पुणे (दै. संध्या)**



प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी त्यांच्या भाषणात संविधानांचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख टाळल्याने चांगलेच वातावरण तापले आहे. वाद चिघळल्यानंतर गिरीश महाजन यांनी आपण अनावधानाने नाव घ्यायचे विसरलो, असे स्पष्टीकरण दिले. आता यावर प्रतिक्रिया देताना वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी गिरीश महाजन यांची थेट मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. अनावधानाने नाव घ्यायचे विसरलात, तर अनावधानाने मंत्रिपदही काढून टाकण्यात यावे, अशी टीका आंबेडकरांनी केली आहे.

गिरीश महाजन यांनी दिलेल्या स्पष्टीकरणावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, ज्या संविधानामुळे तुम्ही मंत्री झालात, ते संविधान कोणी लिहिले हेच जर तुम्हाला माहिती नसेल, त्यांचे नाव तुम्हाला घेता येत नसेल तर तुम्हाला पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, अशी टीका करत आंबेडकरांनी पदाचा राजीनामा देण्याची मागणी केली आहे. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर देखील निशाणा साधला आहे. ते म्हणाले, आरएसएस नेहमीच दुतोंडी भूमिका घेते. एकीकडे आम्ही बाबासाहेबांना मानतो असे म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्या विचारांच्या विरोधात कृती करायची. हिंदू कोड बिलाला सर्वात आधी विरोध कोणी केला असेल तर तो आरएसएसनेच केला होता. मनुस्मृतीने महिलांना हिंदू धर्मात कोणताही अधिकार दिला नव्हता, ना मालमत्तेचा, ना वैयक्तिक, ना स्वतःच्या शरीराचा. हे सर्व अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिले. त्यामुळेच आज एक महिला अधिकारी (माधवी जाधव) जाब विचारण्यासाठी पुढे आली, असे आंबेडकर म्हणाले.

गिरीश महाजन यांनी आपण अनावधानाने नाव घ्यायचे विसरल्याचे म्हटले होते, यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, जर ही चूक अनावधानाने झाली असेल, तर तुमचे मंत्रिपदही अनावधानाने काढून टाकण्यात यावे. ही काही छोटी-मोठी चूक नाही.

## पोलिसांनी वाचवले २७ प्रवाशांचे प्राण

**जालना (दै. संध्या)**



पुण्याकडून यवतमाळच्या दिशेने २७ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या लक्झरी बसला (MH-29 AW 4444) आज पहाटे तीन वाजेच्या सुमारास भीषण आग लागली. जालना-छत्रपती संभाजीनगर मार्गावरील बदनापूर तालुक्यातील शेळगाव येथील पेट्रोल पंपासमोर ही घटना घडली. बसचे टायर फुटल्याने लागलेल्या या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली असली, तरी पोलिस उपनिरीक्षक जैस्वाल आणि पोलिस कॉन्स्टेबल अब्दुल बारी यांच्या तत्परतेमुळे सर्व २७ प्रवासी सुखरूप आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ही बस काल रात्री पुण्यातून प्रवाशांना घेऊन निघाली होती. पहाटे तीनच्या सुमारास शेळगावजवळ अचानक बसचे टायर फुटले. चालकाने वाहनावर नियंत्रण मिळवले, मात्र टायरच्या घर्षणामुळे बसने तातडीने पेट घेतला. यावेळी बसमधील सर्व प्रवासी गाढ झोपेत होते. आगीचा भडका उडताच प्रवाशांमध्ये मोठी घबराट पसरली आणि गोंधळ निर्माण झाला. घटनेची माहिती मिळताच 'डायल ११२' च्या माध्यमातून बदनापूर पोलिसांना निरोप मिळाला. पोलिस उपनिरीक्षक जैस्वाल आणि पोलिस कॉन्स्टेबल अब्दुल बारी यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. अब्दुल बारी यांनी तत्काळ अग्निशामक दलाला पाचारण केले. तोपर्यंत आगीने रौद्र रूप धारण केले होते. पोलिसांनी जीवाचे रान करून बसमध्ये अडकलेल्या आणि गाढ झोपेत असलेल्या २७ प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढले. अग्निशामक दलाचा बंब घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी आली. काही वेळातच बस जळून खाक झाली आणि केवळ सांगाडा शिल्लक राहिला. जर पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप केला नसता, तर मोठी जीवितहानी झाली असती, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय

## हे किळसवाणे कोठून येते?

विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. बेकायदेशीर शाळेच्या महिला सहाय्यक नसलेल्या व्हॅनमध्ये एका चिमुकलीचा विनयभंग झाला. साधारण दीड वर्षांत घडलेल्या दुसऱ्या विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. या प्रकराची माहिती बातम्यांमध्ये काल आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात अस्वस्थता पसरली. बदलापूरमध्ये साधारण वर्ष - सव्वा वर्षापूर्वी शाळकरी मुलीच्या विनयभंगाचा दुर्दैवी प्रकार घडला होता. शाळेतल्या शिपायाकडूनच विनयभंगाचा प्रकार झाल्याने आणि शाळा प्रतिष्ठित, ख्यातनाम असल्याने पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास हयगय चालवली, तेव्हां बदलापूरकरांनी मोठ्या संख्येने रेल्वे रुळावर उतरून आपल्या भावनांना वाट करून दिली होती. त्या उद्रेकाने सगळ्या यंत्रणा वठणीवर आल्या होत्या. त्या विनयभंग प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेनंतर पोलिसांच्या गाडीत झालेल्या चकमकीत मारला गेला. त्या संपूर्ण प्रकरणाची आठवण महाराष्ट्राला काल पुन्हा एकदा झाली. गेल्या प्रकरणात शाळकरी मुलगी होती. यावेळी पूर्वप्राथमिक शाळेत, म्हणजे बालवाडीत जाणारी अवघी चार वर्षांची चिमुकली आहे. गेल्यावेळी शाळेतला शिपाई होता; यावेळी मुलांची शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी व्हॅनचा चालक आहे.

म्हणजे, ज्यांची व्यवस्था मुलांच्या सहाय्यासाठी आणि संरक्षणासाठी केली आहे, तेच दोन्ही प्रकरणात आरोपी आहेत! अशावेळी विश्वास कोणावर ठेवायचा, असा प्रश्न हतबल पालकांसमोर उभा ठाकल्याशिवाय राहात नाही. दोन्ही घटना बदलापुरात घडल्याने हा प्रश्न केवळ बदलापूरपुरता सीमित आहे, असा गैरसमज करून घेण्याचं कारण नाही. याची व्याप्ती पूर्ण देशभर आहे. महाराष्ट्राने; निदान महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्र्यांनी आणि पोलीस महासंचालकांनी तरी याची गंभीर दखल घेतली पाहिजे. अशा घटना घडू नयेत यासाठी कडक प्रतिबंधात्मक व्यवस्था केली पाहिजे. महाराष्ट्रातल्या महानगरी, शहरी, निमशहरी, ग्रामीण-अशा सर्व ठिकाणी समान पद्धतीने लागू करता येईल, अशीच ही उपाययोजना असायला हवी. बदलापूरला आता महिला नगराध्यक्ष असल्याने त्यांनी स्थानिक पातळीवर या प्रश्नाच्या खोलात जाऊन संबंधित यंत्रणांना उपाययोजनांसाठी मदतही केली पाहिजे. कारण, या शहराची इभ्रत राखण्याची सगळ्यात पहिली जबाबदारी त्यांची आहे! बदलापुरात अगदी कमी अंतराने दोन घटना घडल्या आणि पहिल्या प्रकरणात पोलिसांनी सुरुवातीला गहाळपणा केला, अन्यथा बदलापूरचं नांव एवढं चर्चेत येण्याचं काही कारण नव्हतं.

अशाच घटना यापूर्वी मुंबईत, उच्चभ्रूंच्या मानल्या जाणाऱ्या शाळेतही घडल्या आहेत. त्या प्रकारानंतर शाळेच्या बस आणि शाळेने नेमलेल्या खासगी कंत्राटदारांच्या बस याबाबत बरीच चर्चा झाली होती. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या अशा बसमध्ये एक महिला सहाय्यक असावी, मुलांना बसमध्ये घेण्याची आणि शाळा सुटल्यानंतर त्यांना बसमधून पुन्हा पालकांच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी या महिला सहाय्यकावर सोपवावी, असा तोडगा निघाला होता. त्याची अंमलबजावणीही झाली होती. मुंबईत घडलेल्या त्या घटनेचे पडसाद इतके तीव्र होते, की बसच काय; मुलांची शाळेसाठी वाहतूक करणाऱ्या व्हॅनमध्येही महिला सहाय्यकांची नेमणूक करण्यात आली होती. पण, नंतर आपल्याकडे जे घडतं, तेच झालं. काळ लोटला. प्रकरणाचं गांभीर्य कमी झालं. नवं शालेय वर्ष सुरू झालं. व्हॅनमधल्या महिला सहाय्यक गायब झाल्या आणि परवाचा प्रकार घडला! या बालिकांच्याबाबतच नाही, जगात कुठेही महिलांच्या विनयभंगाचे प्रकार घडले, अत्याचाराच्या घटना घडल्या, तर त्यातल्या बहुतांश घटनांमध्ये पुरुष नातेवाईक किंवा परिचितांपैकीच कोणीतरी आरोपी असतात, अशी सिद्ध झालेली आकडेवारी आहे. बदलापूरच्या पूर्वीच्या घटनेतला आरोपी शाळेचा शिपाई होता. परवा घडलेल्या आणि मुंबईतल्याही अलीकडच्या घटनेतले आरोपी विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी असलेल्या गाड्यांचे चालक होते. परवाच्या घटनेच्या तपशिलात पाहिलं, तर व्हॅन नेहमी बालिकेला घेऊन ज्या वेळेला येते, त्यापेक्षा बराच उशीर झाल्याने पालकांनी चौकशी केली, तेव्हा त्यानंतर पाऊण तासाने व्हॅन पोहोचली. परतलेल्या बालिकेचं वर्तन पालकांना खटकल्याने त्यांनी जेव्हा खोदून खोदून चौकशी केली, तेव्हा आक्षेपार्ह प्रकार उघडकीस आला.

## संस्कृत सुभाषित

अन्योन्यसमुपष्टम्भादन्योन्यापाश्चयेण च ज्ञातय:
संप्रतवर्धन्ते सरसीवोत्पलान्युत ।।
(उद्योगपर्व, अध्याय ३६, ३६, महाभारत)

अर्थ : तळ्यात वाढणाऱ्या कमळाप्रमाणे, परस्परांस सहाय्य करून व परस्परांचा आश्रय घेऊन समुदायाचा उत्कर्ष होत असतो.

## गुरु वचन




### यश गाठायचे असेल तर स्वयंशिस्त हवीच

ज्याप्रमाणे आग आपल्या उष्णतेच्या साहाय्याने सोन्याला उजळून टाकते, अगदी त्याचप्रमाणे स्वयंशिस्त कोणत्याही तरूणाचे व्यक्तिमत्त्व चमकविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. स्वयंशिस्त बाळगणाऱ्या तरूणाची पावलं नेहमी यशाकडे वेगाने सरकत असतात; पण ही स्वयंशिस्त म्हणजे नेमके काय तर ही स्वयंशिस्त म्हणजे आपली पावलं योग्य दिशेकडे वळविणे. स्वयंशिस्तीमुळे तुम्ही कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहू शकता. डगमगून न जाता धैर्याने, संकटाचा सामना करू शकता. मात्र स्वयंशिस्त अंगी बाणण्यासाठी गरज असते ती आळस आणि सुखाचा त्याग करण्याची! स्वयंशिस्त लावून घेतल्याने कोणी लहान होत नाही. एकदा का आपण स्वत:ला शिस्त लावून घेतलीत की, तुमच्या व्यक्तिमत्त्वात आणि जीवनात बदल झालाच म्हणून समजा. यामुळे तुम्हाला नैतिक छळ आणि निरोगी आरोग्य लाभते, ते वेगळेच.

## उपदेशकथा

एकदा संगीतकार नौशाद सेटवर आले आणि त्यांनी भराभर सूचना करण्यास सुरुवात केली. सोफा या दिशेला ठेवा, फ्लॉवर पॉट इकडच्या टेबलावर ठेवा. गालीचा बदला. त्याऐवजी दुसऱ्या रंगाचा गालीचा आणा. सारेजण चकित होऊन पहायला लागले. दिग्दर्शक मेहबूबखान यांना मात्र याचं कारण कळून चुकलं. आदल्या दिवशी रेकॉर्डिंग रूममध्ये नौशाद साहेबांना गाण्याबद्दल त्यांनी अशाच सूचना दिलेल्या होत्या. त्यावेळी संगीतकार नौशाद यांनी त्यांना प्रत्युत्तर केलं नव्हतं. सर्व सूचना निमूटपणे ऐकल्या होत्या. दुसऱ्या दिवशीच्या या कृतीचा अर्थ फक्त मेहबूबखान यांनाच समजला. मोठ्या मनाच्या मेहबूब खान यांनी आपली चूक मानली. खिलाडूपणानं स्वीकारली. पुढे दोघांची मैत्री प्रदीर्घकाळ टिकली. त्यानंतर मेहबूब खाननी संगीताच्या कामात नौशाद साहेबांवर पूर्ण विश्वास टाकला.

कथा उपदेश : आपल्या कार्यक्षेत्रात काम करीत राहावं. दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करू नये.

## पंचांग

पंचांग
२८ जानेवारी २०२५
बुधवार

विक्रम संवत्– २०८२
माघ शके संवत्– १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– माघ
ऋतु– सौर शिशिर
शुक्ल पक्ष
तिथि:दशमी १६:३६:१९
नक्षत्र:कृत्तिका ०९:२६:४१
योग:ब्रह्म २३:५३:३०

करण:गर १६:३६:१९
करण:वणिज
२७:१६:५६+
सूर्य:मकर
चन्द्र:वृषभ

हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – शाबान
तारीख – ८

विशेष
लाला लजपतराय जयंती
भक्त पुंडलिक
उत्सव – पंढरपूर

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 2 | 4 | | | | 7 | 3 |
| 5 | 4 | | 2 | | | | 9 | |
| | | | | 5 | 1 | 2 | | 4 |
| | | 7 | 8 | | 9 | | | |
| | 8 | | 6 | | 3 | | 1 | |
| | | | 7 | | 5 | 8 | | |
| 3 | | 6 | 1 | 9 | | | | |
| | 2 | | | | 6 | | 3 | 9 |
| 8 | 1 | | | | 2 | 4 | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८४२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 4 | 5 | 3 | 9 | 8 | 2 | 6 | 1 |
| 3 | 2 | 6 | 1 | 4 | 7 | 8 | 5 | 9 |
| 1 | 9 | 8 | 5 | 6 | 2 | 7 | 4 | 3 |
| 4 | 8 | 1 | 7 | 2 | 5 | 3 | 9 | 6 |
| 2 | 6 | 3 | 8 | 1 | 9 | 4 | 7 | 5 |
| 5 | 7 | 9 | 6 | 3 | 4 | 1 | 8 | 2 |
| 6 | 5 | 4 | 2 | 7 | 3 | 9 | 1 | 8 |
| 8 | 3 | 7 | 9 | 5 | 1 | 6 | 2 | 4 |
| 9 | 1 | 2 | 4 | 8 | 6 | 5 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ८४७ – सर्जियस दुसऱ्याने पोपपद सोडले.
- १३४३ – पोप क्लेमेंट सहाव्याने पोपचा फतवा काढला व त्याद्वारे पास्क्रि क्रेस्नेलच्या १०१ प्रश्नांची निर्भत्सना केली.
- १६९५ – ऑट्टोमान स्म्राट अहमद दुसऱ्याच्या मृत्यु नंतर मुस्तफा दुसरा स्म्राटपदी.
- १८२५ – अमेरिकन काँग्रेसने आत्ताच्या ओक्लाहोमा राज्याच्या प्रदेशात ईंडियन प्रभाग तयार केला. यानंतर पूर्व अमेरिकेतील मूळ निवासींना येथे जाण्यास भाग पाडले. याला अश्रूंची वाट हे नाव दिले गेले.

### राष्ट्रीय

- २००८ – बाराबंकी जिल्ह्यातील दौलतपुर या गावात महानायक अमिताभ बच्चन यांनी सहकुटूंब उपस्थित राहून सून ऐश्वर्याच्या नावाने बनणाऱ्या ऐश्वर्या बच्चन कन्या महाविद्यालयाचे भूमिपूजन केले.

### जन्म

- १७५६ – वुल्फगॅन्ग आमाद्युस मोझार्ट, ऑस्ट्रियाचा शास्त्रीय संगीतकार.
- १८३२ – लुईस कॅरोल, ईंग्लिश लेखक (टोपणनाव).
- १८५९ – विल्हेम दुसरा, जर्मनीचा कैसर.
- १९२४ – साबु दस्तगीर, भारतीय अभिनेता.
- १९५५ – जॉन रॉबटर्स, अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश.
- १९६७ – बॉबी देओल, भारतीय अभिनेता.

### निधन

- १४९० – अशिकागा योशिमासा, जपानी शोगन.
- २००८ – इंडोनेशियातील कम्युनिस्ट आंदोलन दडपून ३२ वर्षे शासन करणारे हुकूम शहा सुहार्तो यांचे निधन.

प्रतिवार्षीक पालन
ज्यू स्मृति दिन – भारत.

## : SMS :

Lady- Kya tumhari bus mein bachho ka aadha kiraya lagta hai,
Conductor- Haan,Agar 12 Se Kam ho,
Lady- Theek hai, Mere to 10 hi hain,..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६.६ | १४.७ |
| अहमदनगर | २६.४ | १५ |
| अकोला | २८.५ | १६.५ |
| अमरावती | २७.९ | १६ |
| बीड | २९.१ | १७.१ |
| भंडारा | २८.२ | १४.३ |
| बुलढाणा | १८.१ | ७.४ |
| चंद्रपूर | २९.१ | १६.८ |
| चेन्नई | २९.४ | २४.२ |
| नवी दिल्ली | १७.४ | ७.८ |
| धुळे | २८.३ | १७.८ |
| गोंदिया | २७.६ | १५.५ |
| जळगाव | २८.१ | १६.३ |
| कोल्हापूर | २८.२ | १३.९ |
| लातूर | २८.१ | १६.२ |
| मुंबई | २९.४ | २१ |
| नागपूर | २७.६ | १५.५ |
| नांदेड | २९.१ | १७.३ |
| नंदूरबार | २६.३ | १६.८ |
| नाशिक | २७.३ | १४.७ |
| पुणे | २६.९ | १२.८ |
| पंढरपूर | २८.६ | १६.९ |
| सातारा | २७.८ | १० |
| सांगली | २८.९ | १५.१ |
| सोलापूर | २९.१ | १६.३ |
| वर्धा | २८.७ | १५.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**तुळ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा :पूर्व
आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व
चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा :पश्चिम
जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा.

**मकर :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
मनोधेर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नोकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**सिंह :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: दक्षिण
केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल.

**मीन :** शुभ रंग : काळा,शुभ दिशा:पूर्व
आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. आर्थिक फायदा होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४३



### आडवे शब्द

१. मुस्लीम शासनकर्ते
३. सोमवारची अमावस्या
६. नंतर
८. नेहमी
११. मुमताज बेगमची कबर
१३. थांबून थांबून केलेला प्रवास
१६. नम्र वाकलेला
१८. एक नदी
२०. फणसाचा एक प्रकार
२१. घ्राणेंद्रिय
२२. उष्ण
२५. मत देणारा
२६. कलंक
२७. एक कडू फळ, हिंदीत कूस
२८. पेन ठेवण्याची पेटी
२९. मोठी बहीण
३०. मज्जाव
३१. खासगी
३४. वरपांगी
३७. हाताचा तळवा
४१. श्रीकृष्णाचे एक नाव
४४. फिकीर, काळजी
४५. उष्णतेने पायाला भेगा पडण्याचा रोग
४६. सोन्याचा धागा
४७. बेडर
४८. तोंडी करार
५०. जल
५१. सोन्या–चांदीचा व्यापारी
५२. महिला, स्त्री
५३. मृत्यू, वेळ
५१. बाण
५६. पटल
५७. कोवळ्या दुधाचा पदार्थ
५८. देखत, समोर
६०. रविवार
६३. कापणे
६४. खिन्न, कष्टी, निरपेक्ष
६६. चिता
६७. मोठी नदी
६९. भिस्त
७०. वेळेवर हजर असणाऱ्याला मिळणारे पद
७१. किराणा व्यापारी
७२. धपाटा
७३. चांदण्याचा ऋतू
७४. करवंद
७५. स्नान न केलेला
७६. नाविक दल
७७. लावलेला पिंजरा
८०. पोळ्या भाजण्याचे साधन
८१. लाख
८२. झकास, सुंदर
८३. डोळ्यावरील उघडझापीचा अवयव

### उभे शब्द

१. रानावनात वाढलेला गोष्टीतील मुलगा
२. वेल
३. चंद्र
४. मोठा, प्रचंड
५. वर्तुळ
६. मला
७. जहाज
८. 'नटसम्राटाची' पत्नी
९. किंमत
१०. नीच
१२. कोळिष्टकावरील कचरा
१३. मज्जाव
१४. किंमत
१५. संत नामदेवांची शिष्य
१७. शहर
१९. हटकून
२३. बारीक झणझण
२४. उगीच
२५. मनाचा आधीन असलेला
२६. सुताराचे हत्यार
२९. ताठ स्वभावाचा
३२. जेव्हा
३३. किरकोळ सामान
३५. रमापती
३६. मांडणी, सजावट करणारा
३८. चंद्र
३९. बूड
४०. मध्यस्थ
४२. गणक, मोजणी करणारा
४३. प्रत्येक, मूल्य
४७. 'क्ष्मी वंदिले, धारातीर्थी तप ते आचरिती'
४९. सततची हालचाल
५०. झाडावर पिकू लागलेले फळ
५१. सुकुमार
५२. बारसे
५५. रसाळ
५६. पंधरवडा, बाजू
५७. खोदकाम
५९. चामखीळ
६१. विसराळू
६२. उत्सवाचे, सणाचे दिवस
६४. सोडवून दाखविलेले गणित, नमुना
६५. दुर्दशा
६८. प्रत्येक वर्षी
७३. लाज
७५. बासरी
७८. अर्धी ओंजळ
७९. राजपत्नी

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

उभे उत्तर : १.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९.मनन ३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# भारतीय संविधानामुळेच देशाची लोकशाही अधिक बळकट : अजित पवार

## पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री तसेच शौर्य पुरस्कार विजेत्यांचा गौरवपूर्ण उल्लेख

**पुणे (दै. संध्या) :**

भारतीय संविधानाच्या बळावरच विविध भाषा, धर्म, जाती व संस्कृती असलेला भारत देश जगातील सर्वात मोठे व यशस्वी लोकशाही राष्ट्र म्हणून उभा आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित लोकशाही व्यवस्था टिकवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज केले.

७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा आज पोलीस संचलन मैदानावर ध्वजारोहण व संचलनासह मुख्य शासकीय समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा पोलीस अधिक्षक संदीपसिंह गिल उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थित लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे कुटुंबीय, सैन्यदल, निमलष्करी व पोलीस दलांचे अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

स्वातंत्र्यलढ्यात देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करत श्री.पवार यांनी त्यांना भावपूर्ण वंदन केले. गोवा मुक्ती संग्राम, हैदराबाद-मराठवाडा मुक्ती संग्राम तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी हौतात्म्य पत्करलेल्या वीरांचेही त्यांनी अभिवादन केले. देशाची एकता, अखंडता व सार्वभौमत्व अबाधित राखण्यासाठी बलिदान देणाऱ्या सैनिकांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री तसेच शौर्य पुरस्कार विजेत्यांचा गौरवपूर्ण उल्लेख..

केंद्र सरकारच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या शौर्य व सेवा पदक तसेच पद्म पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील मान्यवरांचा समावेश हा राज्यासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे अजित पवार यांनी नमूद केले. पोलीस, अग्निशमन, होमगार्ड व सुधारात्मक सेवांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांसह कला, उद्योग, समाजसेवा, क्रीडा, वैद्यकीय व कृषी क्षेत्रातील पद्म पुरस्कार विजेत्यांनी महाराष्ट्राची मान देशपातळीवर उंचावली असल्याचे त्यांनी सांगितले. स्वातंत्र्यलढा व सामाजिक सुधारणांच्या चळवळीत पुण्याची भूमिका ऐतिहासिक व निर्णायक राहिल्याचेही त्यांनी सांगितले.

शेती, उद्योग, व्यापार, सहकार, बँकिंग, आरोग्य व पायाभूत सुविधांच्या विकासात पुणे जिल्हा अग्रेसर असून आयटी हब, ऑटो हब आणि स्टार्टअप्सचे प्रमुख केंद्र म्हणून पुण्याची ओळख देश-विदेशातील तरुणांना आकर्षित करत असल्याचे श्री. पवार म्हणाले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले भारतीय संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, अभिव्यक्ती व धार्मिक स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाची हमी दिल्यामुळे भारताची लोकशाही अधिक मजबूत झाल्याचे त्यांनी सांगितले.

'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' यांच्या विचारांवरच महाराष्ट्राची प्रगती उभी असून हेच विचार राज्याच्या व देशाच्या शाश्वत विकासाचा मंत्र असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. हे विचार सर्वांनी जपावेत, असे आवाहन त्यांनी केले.

भारतीय सैन्यदल, नौदल, वायुदल, निमलष्करी दल, पोलीस व आपत्ती व्यवस्थापन दल यांच्या अतुलनीय सेवेचा त्यांनी गौरव केला. सीमेवरील त्याग, देशांतर्गत सुरक्षेसाठी केलेले बलिदान व आपत्तीच्या प्रसंगी दाखवलेली तत्परता प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.



लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून संविधानाचे पालन, कायद्याचा आदर, सामाजिक सलोखा व विविधतेत एकता जोपासणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पुरस्कारप्राप्त पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिटचे उपअधीक्षक दयानंद सदाशिव गावडे, पोलीस निरीक्षक अविनाश रोकडेराव शिळीमकर, एसआरपीएफ गट क्रमांक-१ मधील सहायक पोलीस उपनिरीक्षक प्रदीप साहेबराव सानंतु, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सहायक आयुक्त विठ्ठल कुबडे, तसेच महेंद्र कोरे, अमोल फडतरे आणि उपअधीक्षक अनंत माळी यांचा समावेश होता.

पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छ पुणे संकल्प-2026 या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धी रथाला आज उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या त्रिसूत्रीवर आधारित स्वच्छ पुणे, सुंदर पुणे या संकल्पनेवर भर देण्यात आला. प्रचार रथाच्या माध्यमातून कचरा विलगीकरण, प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता सवयी, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि नागरिकांची जबाबदारी याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

यावेळी यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, महापालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम, जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी, पुणे पोलीस आयुक्त श्री. अमितेशकुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, पुणे जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. संदीपसिंह गिल, पुणे महानगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच स्वच्छता विभागाचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मुलांनी बॉम्बे हायकोर्टात सादर केले स्वतःचे 'किडस्टिट्यूशन'

■ प्रजासत्ताक दिनी निकचा आगळावेगळा उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : यंदाच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त निक या बालविश्वातील लोकप्रिय व्यासपीठाने मुलांना केंद्रस्थानी ठेवत एक अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला. या उपक्रमांतर्गत मुलांनी थेट बॉम्बे हायकोर्टात आपले स्वतःचे 'किडस्टिट्यूशन' सादर करत, भारत अधिक आनंदी आणि दयाळू कसा होऊ शकतो याविषयी आपल्या कल्पना मांडल्या. या उपक्रमात मुलांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. मुलांचे आवडते निकटून्स चिकू आणि बंटी, तसेच उत्साही तरुण विचारवंतांच्या टीमने या कार्यक्रमात रंगत आणली. मुलांनी अभिमानाने आपले 'किडस्टिट्यूशन' सादर करत काही मजेशीर पण अर्थपूर्ण मागण्या केल्या. त्यामध्ये जेवणाच्या ताटात दुधी भोपळ्यासारख्या भाज्या नकोत, खेळण्यासाठी अधिक मोकळी जागा हवी, तसेच सर्व सजीवांशी प्रेमाने आणि दयाळूपणे वागले पाहिजे, अशा अपेक्षांचा समावेश होता. हे 'किडस्टिट्यूशन' प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत सादर करण्यात आले. यामध्ये बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे अध्यक्ष अॅड. हर्षद वसंतराव निंबाळकर, उपाध्यक्ष अॅड. डॉ. उदय वरूंजीकरण, बीसीएमजीचे सदस्य व माजी अध्यक्ष अॅड. सुदीप पासबोला, अॅड. विठ्ठल कोंडे देशमुख आणि सचिव श्री. शरद बागुल यांचा समावेश होता. निकसोबत साजऱ्या झालेल्या या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात मुलांच्या विचारांना आणि आवाजाला खऱ्या अर्थाने प्राधान्य देण्यात आले. या उपक्रमामुळे मुलांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव वाढीस लागली असून, त्यांच्या कल्पनांना व्यासपीठ मिळाल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.



### प्रजासत्ताक दिनी चलवादी शिक्षण संस्थेच्या नभांगणात डौलाने फडकला तिरंगा !

पुणे (दैनिक संध्या) : देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मंगल पर्वावर विद्यानगर येथील 'चलवादी शिक्षण संस्थे'च्या प्रांगणात देशभक्तीचा अभूतपूर्व सोहळा रंगला. सोहळ्यात पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात पुणे महानगर पालिका शिक्षण मंडळाचे माजी सदस्य बाळासाहेब जानराव प्रमुख वक्ते तर, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी, शाळेच्या उपाध्यक्ष अॅड.रेणुका चलवादी, सुधीर वाघमोडे, स्वप्नील शिर्के, योगगुरू नामदेव इंगळे, सुरेखा जानराव आणि सायली शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. "भारतीय संविधान हे केवळ कागदावरचे नियम नाहीत, तर तो या देशाचा आत्मा आहे.हा आत्मा जिवंत ठेवण्यासाठी आणि एक सुजाण नागरिक घडवण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासूनच मुलांच्या मनात संविधानाचे बाळकडू रुजवले पाहिजे.", असे प्रतिपादन ध्वजवंदनेनंतर उपस्थितांना संबोधित करतांना बाळासाहेब जानराव यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि संस्थेचे चेअरमन डॉ.हुलगेश चलवादी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना म्हटले की, "आज मुलांच्या डोळ्यांत जी चमक आणि आवाजात जो जोश दिसला, तो पाहून खात्री पटली की भारताचे भविष्य सुरक्षित हातांत आहे." त्यांनी विद्यार्थ्यांच्या देशप्रेमी सादरीकरणाला मनापासून दाद दिली. कार्यक्रमाची रंगत खऱ्या अर्थाने वाढवली ती शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी. देशभक्तीपर गीते, समूहगानातील सूर आणि समूह नृत्यातील ताल यांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध कवायत संचालनाने जणू भारतीय सैन्याच्या सामर्थ्याची छोटी झलकच दाखवून दिली. त्यानंतर सादर झालेले योगा, सूर्यनमस्कार आणि जिम्नॅस्टिकची चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. मैदानावरील खेळांत घाम गाळून यश मिळवणाऱ्या १४ वर्षांखालील खेळाडूंचा (फुटबॉल, खो-खो, क्रिकेट) आणि चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे अत्यंत ओघवते आणि प्रभावी सूत्रसंचालन अर्पिता रथ यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मानताना स्मिता लोंढे यांनी या अविस्मरणीय सोहळ्याची सांगता केली.



## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडून राष्ट्रध्वजास मानवंदना

**पुणे (दै. संध्या) :**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## बजाज जनरल इन्श्युरन्स कडून 'फेटल फ्लरिश' रायडरची घोषणा

**पुणे (दै. संध्या) :**

बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड अग्रगण्य प्रायव्हेट जनरल इन्श्युरन्स कंपनीने त्यांनी 'फेटल फ्लरिश' या रायडरची घोषणा केली आहे. विशेषत: गर्भस्थ शिशूच्या आरोग्यासाठी हे रायडर अत्यंत उपयुक्त मानले जाते. ही सुविधा अधिक जोखमीच्या गर्भधारणांसाठी आणि आधुनिक गर्भातील उपचारांसाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करते. आजवर उपलब्ध असलेल्या पारंपरिक मॅटर्निटी इन्श्युरन्स मध्ये अशाप्रकारचा बाबींचा अंतर्भाव नव्हता. या रायडरची उपलब्धता "माय हेल्थ केअर प्लॅन" आणि "हेल्थ गार्ड" या फ्लॅगशिप प्रॉडक्ट सह करण्यात आली आहे.




फेटल फ्लरिश मध्ये प्रसूतीपूर्व काळजीमध्ये गंभीर आवश्यकता पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञता आणि इन्श्युरन्स यांचे एकत्रित संयोजन पाहायला मिळते. पारंपरिक मातृत्वाशी संबंधित उत्पादने प्रसूती व प्रसूतीनंतरच्या उपचारांवर लक्ष केंद्रित करतात; मात्र हे रायडर गर्भातील सर्वात नाजूक टप्प्यात—आईच्या गर्भाशयात असलेल्या गर्भस्थ शिशूच्या संरक्षणावर लक्ष केंद्रित करतो.

अहवालांनुसार भारतातील सुमारे १७% टक्के महिला ३५ वयानंतर मातृत्व स्वीकारत असल्यामुळे गर्भधारणेशी संबंधित गुंतागुंत वाढत आहे. उच्च जोखीम असलेल्या गर्भधारणांच्या उपचारांसाठी अॅम्निओसेंटेसिस, फेटल रिडक्शन, फेटोस्कोपिक लेझर सर्जरी आणि इंट्रायुटेरिन ट्रान्सफ्युजन या वैद्यकीय उपचारांची आवश्यकता वाढली आहे. आतापर्यंत, स्वतंत्र इन्श्युरन्स प्रॉडक्ट नसल्यामुळे अशा उपचारांचा संपूर्ण खर्चाचा भार अनेकवेळा कुटुंबालाच सहन करावा लागत होता.

उत्पादन अनावरण वेळी बोलताना, बजाज जनरल इन्श्युरन्सचे एमडी व सीईओ डॉ. तपन सिंघल म्हणाले, "गर्भधारणा हा प्रत्येक कुटुंबासाठी अत्यंत महत्वाचा क्षण असतो. जो आशा, अपेक्षा आणि बाळासाठी सर्वोत्तम करण्याच्या इच्छेने समर्पित असतो. जेव्हा वैद्यकीय जटिलता उद्भवतात, तेव्हा कुटुंबांना अतिशय प्रारंभिक टप्प्यावर कठीण निर्णयांचा सामना करावा लागतो. गर्भस्थ काळजीतील वैद्यकीय प्रगतीने वेळेआधी हस्तक्षेप शक्य केला आहे. पण आर्थिक दबाव हा आधीच भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक असलेल्या अनुभवात अधिक भर घालतो.

फेटल फ्लरिश या रायडरच्या माध्यमातून आवश्यक उपचार प्रक्रियांना पाठबळ देत आम्ही हा भार कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. जेणेकरून पालकांना खर्चाऐवजी उपचारांवर आणि परिणामांवर लक्ष केंद्रित करता येईल. ही ऑफर जीवनाच्या अतिशय प्रारंभिक टप्प्यापासूनच काळजी आणि संरक्षण सुरू व्हायला हवे, या आमच्या विश्वासाचे प्रतिबिंब आहे."

## नवा अध्याय : 'वध २'चा दमदार ट्रेलर प्रदर्शित

**पुणे (दै. संध्या) :**

लव फिल्म्सची आगामी थ्रिलर-मिस्ट्री चित्रपट 'वध 2'चा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. संजय मिश्रा आणि नीना गुप्ता यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचं लेखन व दिग्दर्शन जसपाल सिंग संधू यांनी केलं आहे. ट्रेलरमध्ये थरार, भावनिक संघर्ष आणि एक नवी कथा पाहायला मिळते, मात्र कथेतली मुख्य घटना अजूनही सस्पेन्समध्ये ठेवण्यात आली आहे. ट्रेलरमध्ये कलाकारांची गंभीर आणि वास्तवदर्शी अभिनयशैली स्पष्टपणे दिसून येते, ज्यामुळे चित्रपटाची भावनिक खोली अधिक ठळक होते. संजय मिश्रा आणि नीना गुप्ता यांच्यासोबतच, लव रंजन आणि अंकुर गर्ग यांच्या लव फिल्म्स बॅनरखाली तयार झालेल्या 'वध 2'मध्ये कुमुद मिश्रा, शिल्पा शुक्ला तसेच नवे कलाकार अमित के सिंग, अक्षय डोगरा आणि योगिता बिहानी ही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाबद्दल बोलताना




लेखक-दिग्दर्शक जसपाल सिंग संधू म्हणाले, "'वध 2' असा घडवण्यात आला आहे की, तो मजबूत कथा आणि स्पष्ट व्यक्तिरेखांसह प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव देईल. आम्ही स्टोरीटेलिंगला आणखी एक पायरी पुढे नेलं आहे, जेणेकरून प्रेक्षकांना एक लेयर्ड थ्रिलर-मिस्ट्री अनुभवता येईल. ट्रेलरमध्ये 'वध 2'च्या त्या नैतिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या जगाची झलक आहे, जिथे सत्य नेहमीच स्पष्टपणे दिसून येत नाही."

प्रोड्यूसर लव रंजन यांनी सांगितले, "'वध 2' ही पहिल्या चित्रपटाच्या विचारधारा आणि भावनिक खोलीला पुढे नेणारी आहे, मात्र पूर्णपणे नव्या कथेसह. या फ्रँचायझीचं नेतृत्व संजय मिश्रा आणि नीना गुप्ता यांसारखे अनुभवी कलाकार करत आहेत आणि त्यांच्यासोबत कुमुद मिश्राही आहेत, ही या चित्रपटाची खास बाब आहे. या तिघांची प्रभावी स्क्रीन प्रेझेन्स हे सिद्ध करते की मजबूत कथा वयाच्या किंवा ठराविक चौकटींच्या पलीकडे असतात."

## विभागीय आयुक्त कार्यालयात राष्ट्रध्वजास मानवंदना

**पुणे (दै. संध्या) :**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

यावेळी अपर आयुक्त तुषार ठोंबरे, डॉ. स्वाती देशमुख-पाटील, नितीन माने, उपायुक्त रमेश बेंडे, संजीव पलांडे, तसेच विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते. यावेळी डॉ. पुलकुंडवार यांनी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



## प्रोस्टेट कॅन्सरसाठी 'फोकल वन®' रोबोटिक HIFU थेरपी सुरू

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे, 27 जानेवारी 2026 :

रूबी हॉल क्लिनिकने कर्करोग उपचार क्षेत्रात एक ऐतिहासिक टप्पा गाठत भारतीय उपखंडातील पहिली फोकल वन® रोबोटिक हाय-इंटेन्सिटी फोकस्ड अल्ट्रासाऊंड (HIFU) थेरपी प्रोस्टेट कॅन्सरसाठी सुरू केली आहे. ही अत्याधुनिक, नॉन-इनवेसिव्ह उपचार पद्धत रूबी हॉल क्लिनिकमध्ये नव्याने सुरू झालेल्या कल्याणी इन्स्टिट्यूट ऑफ रोबोटिक HIFU थेरपी येथे रुग्णांसाठी उपलब्ध असेल.

या सुविधेचे उद्घाटन रूबी हॉल क्लिनिकचे नेतृत्व डॉ. पी. के. ग्रँट, डॉ. सायमन ग्रँट आणि डॉ. हिमेश गांधी तसेच कल्याणी कुटुंबाचे प्रतिनिधी डॉ. बाबा कल्याणी, सौ. सुनीता कल्याणी आणि भारत फोर्जचे श्री. अमित कल्याणी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी फोकल वन संस्थेचे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ प्रो. पास्कल (युनिव्हर्सिटी ऑफ टुलूज), डॉ. डॅमियन तसेच उपाध्यक्ष व सीईओ श्री. रायन हेही उपस्थित होते.



भारतामध्ये दरवर्षी ४०,००० हून अधिक नवीन प्रोस्टेट कॅन्सरची प्रकरणे निदानास येतात. मात्र, शस्त्रक्रिया किंवा किरणोपचारांशी संबंधित जोखमी, दीर्घ पुनर्प्राप्ती कालावधी आणि मूत्र व लैंगिक कार्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांमुळे अनेक रुग्ण उपचार पुढे ढकलतात. रोबोटिक HIFU थेरपी या भीती दूर करणारा प्रभावी पर्याय ठरत आहे.

यावेळी बोलताना डॉ. पी. के. ग्रँट, अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त, रूबी हॉल क्लिनिक म्हणाले, "भारतीय उपखंडातील पहिली रोबोटिक HIFU थेरपी रूबी हॉल क्लिनिकमध्ये सुरू होणे हा कॅन्सर उपचारांच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे.

प्रगत व अर्थपूर्ण वैद्यकीय तंत्रज्ञान रुग्णांपर्यंत वेळेत पोहोचवण्याची आमची बांधिलकी या उपक्रमातून अधोरेखित होते."

क्लिनिकल दृष्टिकोनातून डॉ. हिमेश गांधी, सल्लागार यूरो-ऑन्कोलॉजिस्ट व संचालक, रोबोटिक सर्जरी, रूबी हॉल क्लिनिक म्हणाले,

"अनेक पुरुषांसाठी कॅन्सरइतकीच उपचारांची भीती मोठी असते. रोबोटिक HIFU ही भीती दूर करते, कारण ही नॉन-इनवेसिव्ह पद्धत रुग्णांच्या स्वावलंबनाला आणि लवकर पुर्नप्राप्तीला प्राधान्य देते."

कल्याणी इन्स्टिट्यूट ऑफ रोबोटिक HIFU थेरपीच्या स्थापनेमुळे रूबी हॉल क्लिनिक प्रगत कॅन्सर उपचार क्षेत्रातील आपले नेतृत्व अधिक भक्कम करत असून, सुलभता, क्लिनिकल उत्कृष्टता आणि रुग्णांच्या एकूण अनुभवात सुधारणा यावर विशेष भर देत आहे.


### या उपचारपद्धतीचे प्रमुख फायदे पुढीलप्रमाणे आहेत

- अचूक लक्ष्यीकरण: कॅन्सरग्रस्त ऊती नष्ट करताना आजूबाजूच्या निरोगी ऊती सुरक्षित
- नॉन-इनवेसिव्ह प्रक्रिया: कोणतीही चिरफाड किंवा किरणोत्सर्ग नाही
- जलद पुर्नप्राप्ती: बहुतांश रुग्णांसाठी डे-केअर उपचार; लवकर दैनंदिन आयुष्यात पुनरागमन
- जीवनमानाचे जतन: पारंपरिक उपचारांच्या तुलनेत मूत्र व लैंगिक कार्यावर होणारा दुष्परिणाम लक्षणीयरीत्या कमी

## कलाकारांनी त्यांच्या दैनंदिन आवश्यक गोष्टींबाबत सांगितले!

नवी दिल्ली (दै. संध्या) :

दीर्घकाळापर्यंत शूटिंग आणि व्यस्त वेळापत्रकांमुळे एण्ड टीव्हीवरील कलाकार सतत धावपळ करत असतात, ज्यामुळे सोबत दैनंदिन आवश्यक गोष्टी असल्यास त्यांना सेटवर आरामदायी, सुसज्ज व शिथिल राहण्यास मदत होते. स्वत:ची काळजी घ्यायची असो, उत्साहित राहायचे असो किंवा वैयक्तिक गुड-लक चार्म असो, या लहान वस्तू त्यांच्या दैनंदिन नित्यक्रमामध्ये मोठा फरक घडवून आणतात. सीरत कपूर (मालिका घरवाली पेडवालीमधील सावी), हिमानी शिवपुरी (मालिका हप्पू की उलटन पलटनमधील कटोरी अम्मा) आणि रोहिताश्व गौड (मालिका भाबीजी घर पर हैमधील मनमोहन तिवारी) कधीच न चुकवणाऱ्या गोष्टींबाबत सांगत आहेत. मालिका घरवाली पेडवालीमध्ये सावीची भूमिका साकारणाऱ्या सीरत कपूर म्हणाल्या, माझ्या मते, सुसज्ज राहिल्याने दिवसभर शांत व आत्मविश्वासपूर्ण राहण्यास मदत होते. मी माझ्यासोबत नेहमी पाण्याची बॉटल ठेवते, ज्यामुळे दीर्घकाळापर्यंत शूटिंगदरम्यान पाणी कमी पिण्याची शक्यता असत नाही. मी सोबत लिप बाब व हँड क्रीम देखील ठेवते. स्टुडिओमधील लाइट्स व एअर कंडिशनिंगमुळे माझी त्वचा कोरडी होऊ शकते, म्हणून सोबत ते ठेवते. आणखी एक आवश्यक



वस्तू म्हणजे इअरफोन्स, संगीत ऐकल्याने माझा मूड उत्साहित होतो, सीन्सदरम्यान शिथिल वाटते आणि परफॉर्मन्ससाठी मानसिकदृष्ट्या सुसज्ज राहण्यास मदत होते. मी सोबत लहान डायरी देखील ठेवते, ज्यामध्ये विचार, रिमाइंडर्स व आभार व्यक्त करणाऱ्या नोट्सची नोंद करते. या लहान गोष्टी मला प्रेरित करतात, तसेच व्यस्त दिवस देखील आरामदायी वाटण्यास मदत करतात. मालिका हप्पू की उलटन पलटनमध्ये कटोरी अम्माची भूमिका साकारणाऱ्या हिमानी शिवपुरी म्हणाल्या, अनुभवासह तुम्हाला शिकायला मिळते की सेटवर आराम मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मी नेहमी सोबत शॉल ठेवते, ज्यामुळे मला उबदार आणि आरामदायी वाटते, तसेच घरी असल्यासारखे वाटते. मी माझी औषधे आणि हर्बल लोझेंजेस कधीच विसरत नाही. अभिनय करण्यासोबत भरपूर बोलावे लागत असल्यामुळे आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# ब्राह्मण समाजाने राजकारणात उतरायला हवे - माधव भांडारी

पुणे (दै. संध्या) :

सर्व जाती, संप्रदाय, पंथातील समाजाला सोबत घेत आपल्या संघटनकौशल्याचा चांगला उपयोग करुन ब्राह्मण समाजाने सक्रीय समाजकारण करण्याबरोबरच राजकारणात देखील आपले स्थान बळकट करायला हवे, असे प्रतिपादन भाजपाचे ज्येष्ठ नेते माधव भांडारी यांनी आज येथे केले. सकल ब्राह्मण समाज, पुणे शहर यांच्या वतीने पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत विजयी झालेल्या ब्राह्मण नगरसेवकांच्या सन्मान व अभिनंदन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी भाजपाचे महाराष्ट्राचे सरचिटणीस राजेश पांडे, कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या अध्यक्षा मुक्ता चांदोरकर व समन्वयक भालचंद्र कुलकर्णी व्यासपीठावर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन




सकल ब्राह्मण समाज समितीमध्ये आम्ही सारे ब्राह्मण, अ. भा. ब्राह्मण महासंघ, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक) पुणे केंद्र, परशुराम हिंदू सेवा संघ, ब्राह्मण जागृती सेवा संघ, महाराष्ट्र चित्पावन संघ, चित्पावन अस्तित्व संस्था, देशस्थ ऋग्वेदी शिक्षणोत्तेजक संस्था, याज्ञवल्क्य आश्रम, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, महाराष्ट्र ब्राह्मण सभा, कृष्ण यजुर्वेदी तैतरीय संघ, शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन मध्यवर्ती ब्राह्मण मंडळ, पुणे, विप्र फौडेशन, सर्वशाखीय ब्राह्मण महासंघ, पौरोहित्य पुरोहित फौंडेशन, गौड सारस्वत ब्राह्मण संघ अशा सुमारे 30 ब्राह्मण संस्था, संघटना सदस्य आहेत. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री मंदार रेडे, विश्वनाथ भालेराव, मकरंद माणकीकर, मनोज तारे, ईशानी जोशी, पद्मा जोशी, ऋषिकेश सुमंत, सुनिल पारखी, राजेंद्र कुलकर्णी, नीता पारखी, माधुरी कुलकर्णी, मनोज पांचारीया आदींनी परिश्रम केले.

विश्वजीत देशपांडे यांनी केले.

पुणे महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवक पुनित जोशी, कुणाल टिळक, स्वरदा बापट, मंजुश्री खर्डेकर, मिताली सावळेकर, ज्योत्स्ना कुलकर्णी, निवेदिता एकबोटे व पिंपरी-चिंचवडमधील मंदार देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी धीरज घाटे व मानसी देशपांडे काही अपरिहार्य कारणांमुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

यावेळी भांडारी पुढे म्हणाले की, समाजातून पुढे आलेल्या नेतृत्वाचा गौरव करणे म्हणजे समाजाच्या संघटनशक्तीचा गौरव आहे. राजकारणाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहायला हवे. सुसंस्कारीत आणि सक्षम नेते तयार होण्यासाठी ब्राह्मण समाजाने देखील सक्रीयपणे राजकारणात यायला हवे.

आपल्या संघटन कौशल्याबरोबरच बुध्दी, चिकाटी आणि प्रामाणिकपणाचा प्रत्यय समाजाला द्यायला हवा. सामाजिक कार्यात सक्रीयपणे काम करणारे तरुण कार्यकर्ते राजकारणात येत आहेत, ही आनंदाची बाब आहे. ब्राह्मण समाजाने आपल्या कार्याने सर्व समाजाला आपलेसे केले पाहिजे.

यावेळी भालचंद्र कुलकर्णी म्हणाले की, ब्राह्मण समाजाच्या सरकारकडे विविध मागण्या आहेत, ज्यामध्ये पुण्यात भव्य परशुराम भवन निर्माण व्हावे, पुणे रेल्वे स्थानकाला थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देण्यात यावे, दादोजी कोंडदेव यांच्या पुतळ्याची पुनर्स्थापना करण्यात यावी तसेच शनिवार वाडा आणि पर्वती देवस्थानचे नूतनीकरण व्हावे, ज्यासाठी राज्य सरकार आणि पुणे महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा.

सकल ब्राह्मण समाजाच्या व्यासपीठाखाली पुणे शहरातील 30 ब्राह्मण संस्था, संघटना एकत्रितपणे विविध कार्यक्रम, उपक्रम राबवतात.

## 'झीटीव्ही ने टेलिव्हिजन कथनाची नवीन उंची गाठली!

नवी दिल्ली (दै. संध्या) :

देशभरातील प्रेक्षकांना अर्थपूर्ण आणि उच्च-गुणवत्तेचे मनोरंजन देण्याच्या आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहप्रत्यक्ष ठिकाणी चित्रीकरण करण्याचा झी टीव्हीचा निर्णय हा कथानक अधिक वास्तविक, भावस्पर्शी आणि प्रेक्षकांना पात्रांशी जवळीक साधणारा अनुभव देण्याच्या त्यांच्या बांधिलकीचे प्रतीक ठरतो. आपला अनुभव सांगताना आर्यची भूमिका साकारणारा शरद केळकर म्हणाला, "कथाकथन आणि निर्मितीच्या दृष्टीकोनातून पाहता हा निर्णय आमच्यासाठी अगदी स्पष्ट होता. काही क्षण असे असतात की ते पुन्हा तयार करता येत नाहीत आणि ते अनुभवलेच पाहिजेत. काश्मीरमध्ये शूट केल्याने कथेला ज्या प्रमाणात प्रामाणिकपणा आणि सिनेमॅटिक खोलीची गरज होती, ती मिळाली. हा निर्णय आम्ही जाणीवपूर्वक घेतला कारण तो कथानकासाठी सर्वोत्तम प्रकारे अनुरूप होता."



शूटिंगबद्दल बोलताना अनुची भूमिका साकारणारी निहारिका चौक्सी म्हणाली, "हा सिक्वेन्स माझ्यासाठी आणखी खास ठरला कारण प्रेक्षक अनु आणि आर्यच्या नात्यासाठी किती काळापासून उत्सुक होते, हे मला माहिती आहे.हा सिक्वेन्स काश्मीरमध्ये शूट करणे ही त्या प्रवासाचा योग्य सन्मान करण्याची पद्धत वाटली. प्रेक्षकांना अखेर तो क्षण पाहायला मिळणार आहे, ज्याची ते सुरुवातीपासून वाट पाहत होते. मला वाटतं, त्या ठिकाणामुळे या दृश्याला एक शांत, जादूई स्पर्श मिळतो. हे भावनिक, प्रामाणिक आणि कथा ज्या टप्प्यावर पोहोचली आहे त्याचे खरे प्रतिबिंब आहे."

## विश्रांतवाडी-धानोरी मुख्य रस्त्यावर ड्रेनेजची 'गंगा'

धानोरी पुणे (दै. संध्या) :

■ महापालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिक हैराण

विश्रांतवाडी ते धानोरी या मुख्य रस्त्यावर गेल्या आठ दिवसांपासून ड्रेनेज चेंबर फुटल्याने मैलायुक्त सांडपाणी थेट रस्त्यावरून वाहत आहे. यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून, पादचारी आणि वाहनचालकांना नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. विशेष म्हणजे, तक्रार करूनही पुणे महानगरपालिका याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

रस्त्यावर साचलेल्या मैलायुक्त आणि घाण पाण्यामुळे दुचाकी वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक दुचाकीस्वार या ठिकाणी पडून जखमी झाले आहेत. तसेच, उघड्यावर वाहत असलेल्या मैलायुक्त पाण्यामुळे परिसरात डासांचे प्रमाण वाढले असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. स्थानिक रहिवासी आणि व्यापाऱ्यांना या



दुर्गंधीमुळे दिवसभर नाकाला रुमाल लावूनच वावरावे लागत आहे.

या समस्येबाबत जागरूक नागरिकांनी पुणे महानगरपालिकेकडे तक्रार क्रमांक WA231708 द्वारे रीतसर तक्रार नोंदवली आहे. मात्र, तक्रार करूनही अद्याप प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. महापालिकेच्या

"आम्ही वारंवार तक्रार करूनही प्रशासन ढिम्म आहे. घाण पाणी अंगावर उडत असल्याने चालायचे कुठून हा प्रश्न आहे. पालिकेने त्वरित मोठ्या व्यासाची लाईन टाकावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल."
**- दिलीप डाळीमकर (स्थानिक नागरिक)**

या ढिम्म कारभारामुळे "करदात्या नागरिकांनी जगायचे कसे?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या भागातील ड्रेनेज लाईन अत्यंत कमी व्यासाची आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता ही लाईन अपुरी पडत असल्याने ती वारंवार 'ब्लॉक' होते. केवळ तात्पुरती साफसफाई न करता, या ठिकाणी मोठ्या व्यासाची नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

आता तरी पुणे महानगरपालिका या समस्येकडे गांभीर्याने पाहून तत्काळ दुरुस्तीचे काम हाती घेणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सारस अर्बनने ग्रामीण भागात अर्थिक लाभ पोहचवावा - संतोषनाना डोळस

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : सहकार क्षेत्रातील बॅंकांचा मुख्य उद्देश हा ग्राहकांकडून आर्थिक ठेवींच्या स्वरूपात पैसे जमा करून घेवून त्यावर व्याज मिळवून तेच पैसे इतरांना विविध वित्तीय सेवा कर्जासाठी पुरवणे त्यासाठी जास्तीत जास्त ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला मदत करणे हाच राहीलेला आहे त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या विकासाला मदत होते म्हणून आगामी काळात सारस अर्बन को -ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेने ग्रामीण भागातील जनतेला त्याचा लाभ पुरवावा असे मत रिपाइं श्रमिक ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस यांनी मेळाव्यात व्यक्त केले राजगुरुनगर विस्तार कक्षाच्या वतिने येथील आनंदी आनंद मंगल कार्यालयात संस्थेच्या वतिने सभासद आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी संस्थेचे हितचिंतक म्हणून डोळस बोलत होते यावेळी सारस अर्बन क्रेडिट संस्थेचे संचालक मंडळातील अध्यक्ष भालचंद्र कुलकर्णी, उपाध्यक्ष नितीन जरांडे संचालक गणेश धारप, उल्का मोकासदार, जितेंद्र चंपानेरकर, सुनिल रसाळ, अनिल कावळे, गिरीश भवाळकर, शरद दिक्षित,विजय नातू संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास फडके हे उपस्थित होते तसेच राजगुरुनगरचे माजी सरपंच प्रदीप कासवा,भाजपचे उपजिल्हाध्यक्ष गणेश सांडभोर, राम खेडकर,शरद लोहोट,सविता खेडकर यासह संस्थेचे अनेक सभासद आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवाई मंडळ सार्वजनिक नवरात्रौत्सव कार्यकारणी सन 2026 ते 2030 जाहीर

मुंबई (दैनिक संध्या) : विक्रोळीत कन्नमवार नगरातील सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या शिवाई मंडळ सार्वजनिक नवरात्रौत्सव कार्यकारिणी २०२६ ते २०३० वर्षाची निवडणूक सोमवारी दि.२६ जानेवारी २०२६ रोजी मंडळाच्या कार्यालयात उत्साहात पार पडली अध्यक्षपदी श्री. संतोष तुकाराम कदम यांची बहुमताने निवड झाली तर उपाध्यक्ष म्हणून श्री. किसन (बाळा) शिंदे यांची अगोदरच बिनविरोध निवड झाली होती.अन्य कार्यकारिणीत सचिव श्री. राहुल विजय शिरगांवकर,उप-सचिव श्री. निलेश कोंडीराम सकपाळ,कार्याध्यक्ष श्री.विक्रांत विलास सावंत (विक्की भाऊ),उपकार्याध्यक्ष श्री केतन अशोक खामकर,खजिनदार श्री प्रथमेश प्रकाश मोरे,उप-खजिनदार श्री. रितेश प्रदीप धिवर,हिशोब तपासनीस श्री. मधुकर धोंडू तावडे,श्री. अनिकेत यशवंत चव्हाण हे निवडून आले.विजयी उमेदवारांचे नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुनिता चंद्रशेखर जाधव, शिवसेना उबाठा उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, शाखाप्रमुख अभय राणे,भाजप नेते राजेंद्र नवघणे यांनी भेटून अभिनंदन केले.व त्यांच्या पुढील कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्र प्रथम अभियाना अंतर्गत २१ हजार शाळेमधे दिले जाणार स्वसंरक्षणाचे धडे - शिक्षणमंत्री दादा भुसे

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ कवायतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती रूजविण्यास मदत झाली

■ विद्यार्थ्यांनकडून अतिशय सुंदर कवायतीचे सादरीकरण

७७. व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अमरावती येथील शासकीय ध्वजारोहण राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे साहेब याच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना शिक्षणमंत्री यांनी उपस्थित सर्व स्वातंत्र्य सेनानी,लोकप्रतिनिधी, शेतकरी,अधिकारी,पत्रकार, विद्यार्थी व सर्व उपस्थिताना ना. दादाजी भुसे शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी अमरावती



शहरातील नामवंत विविध शाळेतील तब्बल 2000 हजार विद्यार्थ्यांनी सामुहीक कवायतीचे आयोजन या प्रसंगी करुन शिक्षणमंत्री दादाजी भुसे व सर्व उपस्थितीत मान्यवरांनी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षण विभागाचे कौतुक केले. त्यानंतर शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी आपल्या भाषणामधे शिक्षण विभागाने कॉपीमुक्त अभियान राबविले आहे, आजच्या प्रजासत्ताक दिनी प्रत्येक शाळेत कॉपीमुक्तीबाबत शपथ घेण्यात येणार आहे.या माध्यमातून कार्याच्या परिणामांबाबत जनजागृती होण्यास मदत मिळणार आहे.

मागील १५ ऑगस्ट रोजी आपण देशभक्तीपर गीतांवर सामुहिक कवायत संचलन करण्यात आले. यावेळीही २६ जानेवारीला राज्यभरातील सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राविण्यात आला, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती रूजविण्यास मदत झाली आहे. यात शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानतो.

महाराष्ट्र शासनाने गेल्या काही वर्षात शालेय शिक्षण क्षेत्रात राबविलेले धोरामात्मक निर्णय व उपक्रम हे पूर्णतः विद्यार्थी केंद्रित आहेत. राज्यातील सर्व शाळेत राष्ट्रगीतानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत सन्मानाने गायन करणे, शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रपाद्वारे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, माननीय लोकप्रतिनिधी तसेच अधिकारी यांच्या शाळाभेटी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, शासकीय शाळातील विविध 15 समित्यांचे 4 समित्यात एकत्रीकरण, माजी विद्यार्थी संघ स्थापना, आयडॉल शिक्षक, शाळा,संस्था बैंक निर्मिती, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, आनंददायी शनिवार, क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले बालसंगोपन योजनेतर्गत एकल पालक योजना व राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेच्या राज्यात प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व अधिकाऱ्यांना स्वतः पुढाकार घेवून संबंधितांना लाभ मिळवून देण्यासाठी विभागामार्फत सु-मोटो आदेश, राष्ट्र प्रथम' अभियानांतर्गत राज्यातोल 21 हजारांहून अधिक शाळांमधील मुलीना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे.

यामध्ये राज्यातील विद्यार्थांना 10 हजार माजी सैनिक, एनसीसी आणि स्काऊट गाईड कैडेट्सच्या माध्यमातून लष्करी शिस्त, संचलन आणि देशरक्षणाचे धडे देण्यात येणार आहे.तसेच 10 हजार प्रबोधनकारांमार्फत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय विचार आणि व्यक्तिमत्व विकासासाठी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यातील सर्व शाळांमध्ये वर्षभर विविध शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. विकास हा केवळ रस्ते आणि इमारती अशा पायाभूत सुविधांचा नव्हे, तर तो प्रत्येक सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात बदल घडवणारा असावा, हीच आमची भूमिका आहे.

## स्वामी विवेकानंद शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

पुणे (दै. संध्या) :

पुणे जेपी हेल्थ फाउंडेशन संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम महाराष्ट्र फुले सभागृह, पुणे येथे अत्यंत उत्साहात व आनंदात पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गिरिधारी काळे व प्राजक्ता काळे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून नव-निर्वाचित नगरसेविका प्राचीताई आल्हाट (भाजप) तसेच नगरसेवक निवृत्ती अण्णा बांदल (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) यांनी उपस्थिती लावली. नगरसेवक निवृत्ती अण्णा बांदल म्हणाले विद्यार्थी पालक आणि शिक्षक यात्रिसूत्रीने शिक्षक व पालक मुलांना घडवत असल्याचे यामध्ये दिसून आले. शिक्षक बंधू भगिनींनो तुम्ही एक गुरुस्थानी आहात आणि तुम्ही देशाचे नागरिक घडवत




आहात याबद्दल आम्हाला सार्थ अभिमान आहे. नक्कीच आपल्या शाळेंना कोणत्याही प्रकारचे उणीव जाणवली तर हक्काने आम्ही तेथे उभे राहू. नक्कीच आपल्या शाळेमधून एक उच्च कोटीचा विचारवंत आम्हाला मिळेल आम्ही अशी आशा बाळगतो. नगरसेविका मनोगतामध्ये म्हणाल्या विद्यार्थ्यांमध्ये भारतीय नागरिक घडावा यासाठी स्नेहसंमेलन व विविध स्पर्धा आपल्या शाळेमार्फत आयोजित होत असतात त्याबद्दल नक्कीच देशभक्तीची भावना आपल्या शाळेमध्ये अखंड उज्वल होत असल्याचे त्या विद्यार्थ्यांच्या कलागुणां मधून दिसून येत आहे. मंचावरील आलेल्या मुलांच्या कलांमुळे पालक प्रभावित झाले व शाळेविषयी आणखीनही सकारात्मकतेने पाहू लागले. या प्रसंगी संस्थेचे सन्माननीय ट्रस्टी अनंत बिरादार, तानाजी बिरादार व नारायण बिरादार, पद्मा बिरादार, शितल बिरादार यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाट्य, देशभक्तीपर गीत, सांस्कृतिक व मूल्याधारित कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. नर्सरी ते प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सादरीकरण करत आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडवले. शाळेच्या संस्थापिका यांनी पद्मा बिरादार कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच शाळा व्यवस्थापन आणि ट्रस्टी मंडळाचे विशेष आभार मानण्यात आले. पालकांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याचेही नमूद करण्यात आले.

उत्साहपूर्ण वातावरणात व आनंददायी क्षणांसह वार्षिक स्नेहसंमेलनाची सांगता झाली.


प्रपत्र - १

**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता, कोयना बांधकाम विभाग क्र.१, कोयनानगर यांचे कार्यालय**

**ता.पाटण, जि. सातारा, पिन- ४१५२०७**

**ई-मेल पत्ता- eekcd@gmail.com** **दुरध्वनी क्र. ०२३७२ - २८४३४०**

**ई निविदा सुचना क्र. ०२ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कोयना बांधकाम विभाग क्र.१, कोयनानगर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे रत्नागिरी जिल्हयातील पात्र मजूर सहकारी संस्थाकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कोयना बांधकाम विभाग क्र.१, कोयनानगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. तसेच सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यांत येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची रक्कम रु.लक्ष |
|---|---|---|---|
| १. | कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा १ व २ पोफळी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी या १. प्रकल्पाच्या अधिजल भुयाराचे (Head Race Tunnel) चे सविस्तर निरिक्षण करणे काम. | रत्नागिरी | २०३.९२ |

ई निविदा उपलब्ध कालावधी : दि. २८/०१/२०२६ (१०:००) दि. ०४/०२/२०२६ (१८:००)

ई निविदा उघडणे : दि. ०६/०२/२०२६ (११:००)

जा.क्र. कोबांवि-१/लेशा.५/नि/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, कोयना बांधकाम विभाग क्र.१, कोयनानगर
ता.पाटण, जि. सातारा
दिनांक :-

सही/-
(वि. बा. सानप )
कार्यकारी अभियंता,
कोयना बांधकाम विभाग क्र. १, कोयनानगर.

**क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C5368**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बँकेचे कामकाज 5 दिवस करण्यासाठी देशव्यापी संप यशस्वी

पिंपरी (दैनिक संध्या) : पाच दिवसीय बँकिंग आठवड्याची गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण व्हावी, यासाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियनच्या वतीने 27 जानेवारी रोजी देशव्यापी बँक संपाची हाक देण्यात आली होती. या संपाला सर्व राष्ट्रीयकृत बँकांतील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शंभर टक्के सहभाग नोंदविला. पुणे येथील स्टेट बँकेच्या ट्रेझरी शाखेसमोर सर्व बँक कर्मचाऱ्यांनी एकत्र येत जोरदार निदर्शने केली. मार्च 2024 मध्ये झालेल्या द्विपक्षीय करारामध्ये पाच दिवसीय बँकिंग आठवड्याची मागणी मान्य करण्यात आली होती. मात्र, कराराला जवळपास दोन वर्षे पूर्ण होत असतानाही अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळेच बँक कर्मचाऱ्यांना संपाचा मार्ग स्वीकारावा लागला, अशी माहिती स्टेट बँक वर्कर्स ऑर्गनायझेशनचे सरचिटणीस राजेश मुळे यांनी दिली. बँक कर्मचाऱ्यांवर सध्या कामाचा प्रचंड ताण असून, पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा लागू झाल्यास कर्मचाऱ्यांना त्यांच्या कौटुंबिक व वैयक्तिक आयुष्याला वेळ देता येईल, असेही त्यांनी नमूद केले. इन्शुरन्स, रिझर्व्ह बँक, तसेच शेअर मार्केटसह अनेक वित्तीय संस्थांमध्ये पाच दिवसीय कामकाजाची अंमलबजावणी होत असताना, बँकिंग क्षेत्रात मात्र याबाबत होत असलेल्या दिरंगाईमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. केंद्र सरकारने लवकरात लवकर पाच दिवसीय बँकिंग आठवड्याची अंमलबजावणी न केल्यास, भविष्यात आणखी तीव्र स्वरूपाची आंदोलने व संप करण्यात येतील, असा इशाराही राजेश मुळे यांनी दिला.




### अरविंद एज्युकेशन सोसायटीमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

पिंपरी (दैनिक संध्या) : जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या लिटल फ्लॉवर प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कुल, लिटल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कुल, भारतीय विद्यानिकेतन विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अतुल शितोळे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा आरती राव, सचिव प्रणव राव, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रभात फेरीने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या घोषणांनी सांगवी परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी एनसीसीच्या विद्यार्थ्यांची परेड पार पडली. राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला व भारताचे संविधान विद्यार्थ्यांनी सादर केले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मानवी मनोरे उभारून संघ भावनेची शिकवण देण्यात आली. तसेच देशप्रेम व एकतेची ताकद नृत्यातून सादर केली. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अतुल शितोळे यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगितले. अध्यक्षा आरती राव यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत सुजान नागरिक बनण्याचे आवाहन केले. प्रणव राव यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व सांगून नागरिकांचे हक्क आणि कर्तव्य याविषयी मार्गदर्शन केले.

### भाजपाने मोठ्या मनाने महापौर पद आरपीआयला द्यावे : कुणाल वाव्हळकर

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाने भाजपासोबत बिनशर्त युती करत निवडणूक लढवली होती. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार आंबेडकरी समाज मोठ्या प्रमाणात भाजपाच्या पाठीशी उभा राहिला. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी भाजप कार्यकर्त्यांसोबत खांद्याला खांदा लावून प्रचार करत निवडणूक लढवली, त्यामुळेच भाजपाला घवघवीत यश मिळाल्याचे मत आरपीआय (आठवले) शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर यांनी व्यक्त केले आहे. महापालिका निवडणुकीदरम्यान भाजपाने आरपीआय (आठवले) गटासाठी पाच जागा सोडल्या होत्या. विशेष बाब म्हणजे या सर्व जागांवर आरपीआयच्या उमेदवारांनी भाजपच्या 'कमळ' चिन्हावर निवडणूक लढवली. त्यापैकी दोन जागांवर आरपीआयचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले, तर उर्वरित तीन जागांवर अत्यंत निसटता पराभव स्वीकारावा लागला. महापौर पदासाठी अनुसूचित जाती (एससी) आरक्षण पडेल, अशी अपेक्षा आंबेडकरी समाजाला होती. मात्र यावेळी महापौर पद सर्वसाधारण आरक्षणासाठी राखीव झाल्याने अनेक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सध्या भाजपकडून अनेक इच्छुक महापौर पदासाठी प्रयत्नशील आहेत. मात्र आरपीआय (आठवले) समर्थकांची एकमुखी मागणी आहे की, युतीधर्म जपत महापौर पद आरपीआयला देण्यात यावे अशी भावना कुणाल वाव्हळकर यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, कुणाल वाव्हळकर यांनी स्वतः महापौर पदासाठी इच्छा व्यक्त केली आहे. "भाजपाने मोठे मन दाखवून यावेळी महापौर पदासाठी मला संधी द्यावी," अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली आहे. युतीत दिलेल्या योगदानाची योग्य दखल घेण्यात यावी, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई

पिंपरी (दैनिक संध्या) : देशाचा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा होत असताना पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत २६ जानेवारीच्या पूर्वसंध्येला आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाली. तिरंगा रंगसंगतीतील दिव्यांच्या सजावटीमुळे संपूर्ण इमारत लक्षवेधी आणि राष्ट्रभक्तीचा संदेश देणारी दिसून येत आहे. इमारतीच्या दर्शनी भागावर तसेच सभोवतालच्या परिसरात हिरवा, पांढरा आणि केशरी रंगातील एलईडी दिव्यांची भव्य मांडणी करण्यात आली आहे, ज्यामुळे परिसर अधिकच तेजस्वी व प्रेरणादायी झाला आहे. या रोषणाईमुळे नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून अनेक नागरिक इमारतीसमोर थांबून छायाचित्रे काढत आहेत.

# कॉमिक्स चॅलेंज स्पर्धेत इंद्रायणी नगर शाळेच्या विद्यार्थीनीचे यश

**ऑनलाइन 'काळा घोडा कला स्पर्धे'अंतर्गत करण्यात आले होते आयोजन**




**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इंद्रायणी नगर येथील शाळेतील विद्यार्थिनी लावण्या लोहारे हिने ऑनलाइन काळा घोडा कला स्पर्धेअंतर्गत घेण्यात आलेल्या कॉमिक्स चॅलेंज या प्रकारात उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले आहे. राष्ट्रीय स्तरावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ऑनलाइन काळा घोडा कला स्पर्धेत पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. देशभरातील २०० हून अधिक शाळांचा सहभाग आणि १००० पेक्षा अधिक कलाकृती (एंट्रीज) या स्पर्धेसाठी प्राप्त झाल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा एक महत्त्वपूर्ण, स्पर्धात्मक आणि प्रेरणादायी कला मंच ठरली. ही स्पर्धा तीन आठवड्यांच्या कालावधीत राबविण्यात आली होती. प्रत्येक आठवड्यात विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी कला आव्हाने देण्यात आली होती. यामध्ये डेली कॉमिक्स, बाहुल्या निर्मिती तसेच अभिव्यक्ती कला लँडस्केप्स या उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली आणि त्यांना राष्ट्रीय स्तरावर आपली कला सादर करण्याची संधी मिळाली.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशासनाधिकारी संगीता बांगर व कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले, मुख्याध्यापिका वंदना इन्नानी, कलाशिक्षक विकास आगवणे यांच्या अधिपत्याखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. या यशाबद्दल संबंधित विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थिनीने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला योग्य व्यासपीठ मिळते. महापालिकेच्या शाळांमधील कला शिक्षण आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे.
>
> **– विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**
>
> विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शिक्षण विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. इंद्रायणी नगर शाळेच्या विद्यार्थिनीने राष्ट्रीय स्तरावर आपली कला सादर करून मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, शाळेचे सकारात्मक शैक्षणिक वातावरण महत्त्वाचा आहे.
>
> **– ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

## रावेत परिसरात जलवाहिनीला गळती; पाणीपुरवठा खंडित होणार



**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रावेत परिसरात मुख्य अशुद्ध पाण्याच्या (रॉ वॉटर) जलवाहिनीला गळती आढळून आली आहे. या गळतीमुळे शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम झाला असून पाणीपुरवठा विभागाकडून तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर गळती दुरुस्तीचे काम आज (दि.२५) सायंकाळपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. मात्र, या कामामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांमध्ये आज संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित राहणार असून काही भागांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. तसेच, उद्या देखील काही परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी केले आहे.



## एस.बी.पाटील पब्लिक स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**साक्षर भारत, तंबाखू मुक्त भारत ही प्रतिज्ञा घेतली**

**पिंपरी (दै. संध्या) :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटना समितीने सादर केलेल्या संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० रोजी तत्कालीन केंद्र सरकारने लागू केली. या घटनेमुळे भारत देशाच्या सर्व नागरिकांना सन्मान मिळाला. माझ्या सारख्या दिव्यांग व्यक्तीला देखील उद्योग, व्यवसाय करून सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला. या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाच्या राज्यघटनेचा आपल्याला अभिमान वाटतो असे लघुउद्योजक व सामाजिक कार्यकर्ते राजू कडप्पा हिरवे यांनी सांगितले.

सोमवारी प्रजासत्ताकदिनी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल येथे ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त हिरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी, स्वर्णिमा कुलकर्णी, अनघा आहेर तसेच पालक, शिक्षक संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते. साक्षर भारत, तंबाखू मुक्त भारत ही सार्वजनिक प्रतिज्ञा घेतली. इयत्ता चौथी मधील विद्यार्थी श्रीराम याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील मराठी एकांकिका सादर केली. विद्यार्थ्यांनी परेड, वंदे मातरम् गीत सादर केले. आत्मनिर्भर भारत आणि डिजिटल इंडिया या विषयावर प्रणाली मगर, सान्वी महाले, मधुरा व अन्वी यांनी भाषण केले. डंबेल, योगा, पिरॅमिड याचे प्रात्यक्षिक झाले. रायफल व पिस्तूल शूटिंगचे प्रात्यक्षिक आर्या म्हस्के व ओम पाटील या विद्यार्थ्यांनी केले.

"संविधान का जन्म" हे हिंदी नाटक आणि देशभक्तीपर नृत्य सादर केले. शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन ट्रिझा पिटर्स यांनी केले. आभार स्मिता जाधव यांनी मानले.

## रॉयल कॅसल सोसायटी ५-स्टार मानांकनाच्या उंबरठ्यावर



**प्रमुख पर्यावरणपूरक उपक्रम**

- रॉयल कॅसल सोसायटीमध्ये खालीलप्रमाणे विविध पर्यावरणपूरक प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.
- कचरा व्यवस्थापन व कंपोस्टिंग प्रकल्प – ओल्या कचऱ्याचे खतामध्ये रूपांतर
- रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प – पावसाच्या पाण्याचे संकलन व पुनर्वापर
- एस.टी.पी. (सांडपाणी प्रक्रिया) प्रकल्प – सांडपाण्याची शुद्धीकरण प्रक्रिया
- ग्रे वॉटर प्रकल्प – वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर
- सौर ऊर्जा प्रकल्प – स्वच्छ व पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक २४ अंतर्गत येणाऱ्या रॉयल कॅसल सोसायटी, थेरगाव येथे दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी स्वतंत्र भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय प्रसंगी विविध पर्यावरणपूरक उपक्रमांसह उत्साहात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात क्षेत्रीय अधिकारी तथा उपआयुक्त किशोरजी ननवरे सर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताच्या सुमधुर सुरांत उपस्थित नागरिकांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना अर्पण केली. यावेळी सोसायटीतील पदाधिकारी, सदस्य, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर सोसायटीत नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या ग्रे वॉटर प्रकल्पाचे उद्घाटन उपआयुक्तांच्या हस्ते लाल फीत कापून करण्यात आले. या प्रकल्पामुळे सांडपाण्याचा पुनर्वापर करून पाणी बचतीस मोठा हातभार लागणार असून पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रसंगी किशोरजी ननवरे सर यांनी रॉयल कॅसल सोसायटीच्या कार्याचे विशेष कौतुक करत, पर्यावरणपूरक उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी करणाऱ्या अशा सोसायट्यांना महानगरपालिकेकडून '५-स्टार सोसायटी' म्हणून विशेष मानांकन दिले जाते, असे नमूद केले. तसेच रॉयल कॅसल सोसायटीने राबवलेल्या उपक्रमांच्या जोरावर लवकरच ५-स्टार मानांकन प्राप्त करावे, यासाठी त्यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

अशा प्रकारचे सर्वसमावेशक पर्यावरणपूरक उपक्रम राबवणाऱ्या सोसायट्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे ५-स्टार मानांकन देण्यात येते.

या सर्व उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य निरीक्षक सौ. स्नेहल सुकटे, मुकादम श्री. प्रशांत गोठे व मुकादम श्री. प्रदीप सोनवणे यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल रॉयल कॅसल सोसायटीतर्फे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) पर्यावरणपूरक उपक्रम राबवणाऱ्या सोसायट्यांना व वैयक्तिक सदनिका धारकांना मालमत्ता करामध्ये विविध प्रकारच्या सवलती देते. रेन वॉटर हार्वेस्टिंग, कंपोस्टिंग, सौर ऊर्जा, एस.टी.पी. प्रकल्प यांसारख्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास मालमत्ता कराच्या सामान्य करावर (General Tax) सवलत दिली जाते. तसेच एकापेक्षा अधिक उपक्रम राबविल्यास १० ते १५ टक्क्यांपर्यंत एकत्रित सवलत मिळू शकते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने प्रजासत्ताक दिन साजरा



**पिंपरी (दै. संध्या) :**

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन (दि.२६) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे सकाळी ०८.३० वाजता शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी योगेश बहल म्हणाले की, आज आपला भारत देश जागतिक स्तरावर एक महासत्ता म्हणून उदयाला येत आहे. तंत्रज्ञान असो, अंतराळ संशोधन असो किंवा आर्थिक क्षेत्र, भारताने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पण हे वैभव टिकवून ठेवण्याची जबाबदारी आपल्या तरुणांच्या खांद्यावर आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत, प्रदूषणमुक्त पर्यावरण आणि सर्वांना समान संधी मिळणारा समाज घडवणे, हेच आपले आजचे खरे कर्तव्य आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच यावेळी भारताचे संविधान वाचन करण्यात आले, यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, युवक अध्यक्ष शेखर काटे, शहर कार्याध्यक्ष विजय लोखंडे, नगरसेविका वर्षा जगताप, सविता आसवानी, जितेंद्र ननावरे, विद्यार्थी अध्यक्ष अथर्व कोकणे, ॲड. सचिन औटे, माजी नगरसेवक सतीश दरेकर, धनराज आसवानी, ज्ञानेश्वर कांबळे, मायला खत्री, विनायक रणसुभे, खजिनदार दीपक साकोरे, सेवादल अध्यक्ष ज्ञानेश्वर उर्फ माऊली मोरे, सामाजिक न्याय अध्यक्ष संजय औसरमल, सदर कार्यक्रमासाठी धनाजी तांबे, सुनिल अडागळे इत्यादीसह पदाधिकारींसह अनेक कार्यकर्ते उपस्थिती होते.

# लाडशाखीय वाणी समाज महिला विकास मंडळाचा हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न




**पिंपरी (दै. संध्या) :**

लाडशाखीय वाणी समाज महिला विकास मंडळाच्या वतीने चॅलेंजर पब्लिक स्कूल, पिंपळे सौदागर येथे हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त व आनंददायी प्रतिसाद लाभला. परंपरा, स्नेह आणि संस्कृती यांचे सुंदर दर्शन घडवणाऱ्या या उपक्रमात सुमारे ६०० महिलांनी सहभाग नोंदवला. हळदी-कुंकू समारंभासोबतच खेळ पैठणीचा, आपुलकीचे संवाद आणि सौहार्दाचे वातावरण यामुळे संपूर्ण परिसर प्रसन्नतेने भारून गेला होता. महिलांच्या एकतेचा, सशक्तीकरणाचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या कार्यक्रमात खेळ पैठणीच्या सुप्रसिद्ध निवेदिका सौ.वसुंधरा गोडसे यांच्या माध्यमातून विविध मनोरंजक खेळ, उखाणे घेण्यात आले. विजयी महिलांना आकर्षक पारितोषिके देण्यात आली. पैठणी विजयाचा मान सौ. सविता सागर वाणी (काळेवाडी) आणि सौ. सारिका सचिन शिरोडकर (रावेत) यांनी पटकाविला. उपस्थित सर्व महिलांनी अशा उपक्रमांचे मनापासून स्वागत करत भविष्यातही असे कार्यक्रम व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

"हळदी-कुंकू म्हणजे केवळ परंपरा नव्हे, तर महिलांच्या मनातील स्नेह, एकता आणि शक्तीचा उत्सव आहे," असे मत व्यक्त करत भाजपाच्या नवनिर्वाचित नगरसेविका अनिता ताई काटे, कुंदाताई भिसे, अर्चनाताई तापकीर, स्वप्ना शत्रुघ्न काटे, महिला अध्यक्ष प्रिती ताई कोठावदे, चँलेंजर पब्लिक स्कूलचे चेअरमन संदीपजी काटे, नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन तसेच ओबीसी मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मनोजजी ब्राम्हणकार यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर महिलांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला तसेच आकर्षक भेटवस्तूंचे सौभाग्यवतींना वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी योगिता फुलदेवरे, माधुरी ततार, सोनाली बधान , माधुरी वाणी, स्वाती अमृतकार, अर्चना ब्राह्मणकार, संगिता लाड, माधुरी शिरुडे, कुंदा पाटे, कल्पना बहाळकर, योगिता ब्राम्हणकर, सुवर्णा फुलदेवरे, शितल शिनकर, वृषाली बोरसे, निता शिनकर तसेच उपस्थित महिलांचे विशेष सहकार्य लाभले. याबद्दल वैशाली सोनकुळ यांनी सर्वांचे आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बारामती बाजार समितीमध्ये शासकीय तुर खरेदी साठी ऑनलाईन नोंदणी सुरु

बारामती (दैनिक संध्या) : हंगाम २०२५-२६ मधील शासकीय खरेदी केंद्रा मार्फत तुर खरेदी साठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया दि. २०/०१/२०२२६ पासुन सुरू झाली आहे. शासनाने कळविलेल्या आदेशानुसार दि. २० जानेवारी २०२६ ते दि. २० फेब्रुवारी २०२६ या कालावाधीत केली जाणार आहे. तरी बारामती तालुक्यातील तुर उत्पादक शेतकऱ्यांनी खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीचे सभापती विनायक गावडे व उपसभापती अरूण सकट यांनी केले आहे. केंद्र शासनाने तुरीचा हमीदर रू. ८०००/- असा निश्चित केला असल्याने शासनाच्या निकषा प्रमाणे व ठरलेल्या दराने वाळलेली व स्वच्छ असलेली तुर खरेदी करणेत येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करावयाची आहे. त्यासाठी जमिनीचा ७/१२ उतारा व त्यावर तुरीची नोंद असलेला सन २०२५-२६ पिकपेरा, आधारकार्ड, IFSC कोड सह बँकेचे पासबुक झेरॉक्स,मोबाईल नंबर इत्यादी सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली. सदर दिलेल्या मुदतीत शेतकऱ्यांनी बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघ, बारामती येथे ऑनलाईन नोंदणी करावयाची आहे. ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचीच शासकीय हमी दराने तुर खरेदी करणेत येणार असल्याने शेतकऱ्यांनी मुदतीत नोंदणी करावी. तुर खरेदी सुरू झाले नंतर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना एसएसएम द्वारे कळविणेत येईल, त्यावेळी तुर खरेदी केंद्रावर तुर विक्रीस आणायची आहे. तुरीचा दर्जा पाहुन तुर खरेदी करणेत येईल असे निरा संघाचे चेअरमन सतिश काकडे यांनी सांगितले.



### लोहगाव येथील ब्रिलियंट इंटरनॅशनल स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा

बारामती (दैनिक संध्या) : ब्रिलियंट इंटरनॅशनल स्कूल, लोहगाव येथे दि. 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचा सोहळा अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास शाळेचे संस्थापक माननीय श्री. अशोक बापू खांदवे, डायरेक्टर श्री. सुरज खांदवे, श्री. स्वप्निल खांदवे व सौ. वर्षा खांदवे तसेच प्राचार्य श्री. शशिकांत प्रधान यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मान्यवर पाहुणे म्हणून ब्रिगेडियर एम. के. के. अय्यर (सेना मेडल), श्री. दिलीप दीक्षित (नॉन कमिशन्ड ऑफिसर), श्री. शेख (माजी शिक्षण अधिकारी), श्री. एकनाथ मोझे (चीफ इंजिनियर, एम. एस. ई. बी.), श्री. विश्वजीत जगताप (पोलीस निरीक्षक व ठाणे प्रभारी, लोहेगाव), श्री. पी. डी. व्ही. सिंग, श्री. संतोष शिंदे, सौ. असमा शेख व सौ. पल्लवी पांडे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, समूहगीत, समूहगायन व समूहनृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी व इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये प्रभावी भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांचा शिस्तबद्ध परेड संचलन हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी प्रेरणादायी भाषणे करून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व त्यांना प्रोत्साहन दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्त्व, देशप्रेम, तसेच सध्याच्या आधुनिक युगात ज्ञान, तंत्रज्ञान व शिस्त यांचा योग्य वापर कसा करावा याबाबत मौल्यवान संदेश दिला. ब्रिलियंट इंटरनॅशनल स्कूलमध्ये सर्व धर्मीय सण, जयंती व पुण्यतिथी साजऱ्या करून सर्वधर्मसमभाव व राष्ट्रीय एकात्मतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते. कमी कालावधीतच नावारूपास आलेली ही शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळख निर्माण करत आहे. येथील अनुभवी, कुशल व उच्च दर्जाचे शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे, विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे व शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हा प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम अत्यंत यशस्वी व संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांच्या वतीने सर्वांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

### बारामतीत मोफत दिव्यांग सशक्तीकरण शिबीराचे आयोजन

बारामती (दैनिक संध्या) : स्पार्कमिंडा फाऊंडेशन ग्रुप प्रहार संघटना बारामती आणि सक्षम एनव्हर्मेंट ऑफ पीपल विथ डिसएबिलीटीएस यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दिनांक २८ जानेवारी ) रोजी बारामती तालूका आणि शहरातील दिव्यांग बंधू आणि भगिनींचे मोफत हातपाय तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे,अशी महिती प्रहार दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष मृत्युजय सावंत आणि उपाध्यक्ष दिलीप शिंदे यांनी दिली. बारामती रेल्वे स्टेशन समोरील" रिमांड होम" या ठिकाणी सकाळी दहा ते दुपारी चार वाजे पर्यंत हे शिबीर होणार आहे, डॉ. सुमोध लव्हाळे हे या शिबिरात उपस्थित राहणार आहेत, या शिबिरात कृत्रिम पाय, हात, कॅलिपर कुबड्या, काटी, वॉकर,दिले जाणार आहेत, तसेच दिव्यांग साठी युडीआयडी कार्ड रजिस्ट्रेशन सह रोजगार,मार्गदर्शन आणि सहकार्य केले जाणार असल्याची महिती या संघटनेकडून देण्यात आली आहे. या शिबिराचा लाभ गरजू लाभार्थी यांनी घ्यावा,अशी मागणी करण्यात येत आहे, हे शिबीर मोफत दिव्यांग सशक्तीकरण करिता आहे,अधिक महिती सुद्धा बारामती दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष श्री. सावंत( मोबाईल नंबर- ९५९५५१३३४१ ) व उपाध्यक्ष श्री. शिंदे (मोबाईल नंबर- ९९७५८०६३१०) यांच्या कडे संपर्क साधावा.

### ज्ञानगंगा प्रशालेत प्रजासत्ताक दिनानिमित्त रक्तदान व आरोग्य शिबिराने साजरा

आळंदी (दैनिक संध्या) : ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आळंदी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन तसेच शाळेच्या नवीन इमारतीचा दुसरा वर्धापन दिन सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भव्य रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. हे ध्वजारोहण आळंदीचे नगरसेवक रामचंद्र दत्तोबा भोसले यांच्या हस्ते पार पडले. यावेळी मा.नगरसेवक अशोकराव उमरगेकर, संस्थापक अध्यक्ष विजय गुळवे, प्रतीक गुळवे, वैष्णवी गुळवे तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेली भाषणे, लोकगीत, समूहगीत, देशभक्तीपर गीते व नृत्यांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. विविध गुणदर्शन कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. या उपक्रमांतर्गत आयोजित रक्तदान शिबिरात एकूण १२१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# कृषिक प्रदर्शन ठरले नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण

## शेतकरी सहभागाने गाठला रेकॉर्डब्रेक उच्चांक : राजेंद्र पवार

बारामती (दै. संध्या)

- अप्पासाहेब पवार पशु-पक्षी प्रदर्शनांतर्गत विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण संपन्न
- प्रो. निलेश नलावडे यांनी सर्वांचे आभार मानले व कृषिक-2027 साठी शुभेच्छा दिल्या



शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ रोजी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्र बारामतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाच्या शेवटच्या दिवशी शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला. आज मा. खासदार (राज्यसभा) सौ. सुनेत्रा पवार, मा. सौ. सुनंदाताई पवार यांनी प्रदर्शनास सविस्तर भेट दिली.

आज शेवटच्या दिवशी सहभागी कंपन्यांना ट्रस्टचे चेअरमन मा. श्री. राजेंद्र दादा पवार व मा. श्री. विश्वजित वाबळे, उद्योजक यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व संस्थेचे प्रतिक रोप देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये जैन एरिगेशन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, प्रतिभा बायोटेक, आरडोअर सीड्स, नेचर डीलाईट, राइज एन शाईन, अग्रोस्टार, आत्मा, जिल्हा परिषद, महाराष्ट्र शासन कृषी विभाग इ. कंपन्यांचा व संस्थाचा सन्मान करण्यात आला.

अप्पासाहेब पवार पशु पक्षी प्रदर्शनाअंतर्गत विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचे बक्षीस वितरण ट्रस्टचे चेअरमन मा. श्री. राजेंद्र दादा पवार व विश्वस्त मा. श्री. राजीव देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

HF कालवड स्पर्धातील विजेते व पारितोषिके -

* प्रथम क्रमांक: श्री. प्रदीप पाटील, निमगाव ता. माढा जि. सोलापूर, रु. ३१,०००/- + ट्रॉफी
* द्वितीय क्रमांक: श्री.योगेश टाव्हरे , आंबेगाव, पुणे, रु. २१,०००/- + ट्रॉफी
* तृतीय क्रमांक: श्री. गणेश टाव्हरे , आंबेगाव, पुणे, रु. ११,०००/- + ट्रॉफी

तसेच देशी गाई स्पर्धेमध्ये श्री. देविदास नरवटे , अहमदपूर जि. लातूर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. देशी वळू स्पर्धेमध्ये श्री. संतोष कोकणे ,नंदादेवी ता. दौंड तर संकरित वळू स्पर्धेमध्ये श्री.चंद्रकांत आटोळे,खातगाव ता. कर्जत यांनी प्रथम क्रमांक पटकावला.विजेत्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक मा. श्री.राजेंद्र दादा पवार व मा.श्री.राजीव देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राने आयोजित केलेल्या कृषिक २०२६ प्रात्याक्षिके आधारित कृषी प्रदर्शन नाविन्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण तसेच रेकॉर्ड ब्रेक शेतकरी सहभागाचा उच्चांक गाठणारे ठरले.सर्व सहभागी कंपन्या,स्टॉल धारक,केव्हीकेचे व संस्थेचे सर्व कर्मचारी,विद्यार्थी, स्वयंसेवक व सहभागी शेतकरी तसेच ज्यांच्या ज्यांचा सहभाग या आयोजनसाठी लाभला त्या सर्वांचे संस्थाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रो. निलेश नलावडे यांनी मनापासून आभार मानले व पुढील कृषिक २०२७ साठी शुभेच्छा दिल्या.

## उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर यांच्या हस्ते ध्वजवंदन

बारामती (दै. संध्या)

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त बारामती येथील रेल्वे मैदानावर उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

श्री. नावडकर यांनी या कार्यक्रमात सहभागी झालेल्या संचलन पथकाचे निरीक्षण केले. पथकात शहर पोलीस दल, राष्ट्रीय छात्र सेना, नागरी संरक्षण दल, रस्ता सुरक्षा पथक, अग्निशमन दल यांचा समावेश होता. सर्व पथकांनी संचलनाद्वारे प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली.

यावेळी उप विभागीय पोलिस अधिकारी डॉ.सुदर्शन राठोड, 'एमआयडीसी' चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, तहसीलदार स्वप्नील रावडे, गट विकास अधिकारी किशोर माने, मुख्याधिकारी पंकज भुसे, निवासी नायब तहसीलदार नामदेव काळे, विविध विभागाचे शासकीय अधिकारी, पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक, स्वातंत्र्य सैनिकांचे उत्तराधिकारी, शहरातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

श्री. नावडकर यांनी उपस्थित नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्याची सांगता झाली. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झालेल्या पथकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्राचे वितरण करण्यात आले. मुख्य कार्यक्रमापूर्वी प्रशासकीय भवन येथे ध्वजवंदन प्रशासकीय भवन येथील प्रांगणात तहसीलदार स्वप्नील रावडे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी निवासी नायब तहसीलदार नामदेव काळे, तहसील कार्यालय तसेच प्रशासकीय भवनातील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.



## पाणी, कचरा समस्या सोडवून वाहतूक कोंडी मार्गी लावू - डॉ. दत्तात्रय खांडेभराड

चाकण (दै. संध्या)

चाकण - शिक्रापूर या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाला मुहूर्त मिळाला ही कौतुकास्पद बाब असून, हे काम तातडीने आणि युद्ध पातळीवर सुरू व्हावे, आणि या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी व्हावी, त्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. पाणी, कचरा समस्या सोडवून, पर्यावरण वाढीसाठी पुढाकार घेणार असल्याचा निर्धार भाजपाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी केला आहे. डॉ. खांडेभराड यांनी सांगितले की, " वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि प्रवास अतिजलद होण्यासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाने अर्थात एमएसआयडीसीने पुणे जिल्ह्यात दोन रस्ते प्रकल्प हाती घेतले आहेत. चाकण, तळेगाव व शिक्रापूर या दरम्यानच्या महामार्गावर वाहनांची संख्या मागील काही वर्षात प्रचंड वाढली आहे. तळेगावसह चाकण



औद्योगिक वसाहतीत याच मार्गाने अवजड वाहने येत असल्याने व रुंदीकरणाचे काम रखडल्याने या महामार्गावरचा वाहतुकीचा ताण प्रचंड वाढला आहे. या कोंडीतून आता सुटका होण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करणार आहे. चाकण, मेदनकरवाडी, कडाचीवाडी, रासे, काळुस या दरम्यान रस्त्यालगत पडलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पुढाकार घेणार असून, नागरिकांनी रस्त्यालगत कचरा टाकू नये व इतरांना त्यापासून त्रास होऊ नये असे आव्हान करणार आहे."

## विद्यार्थ्याची इंडिया व एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद

कोरेगावमुळ (दै. संध्या)



नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ब्रेन मास्टर (NiBM), पुणे येथील ॲडव्हान्स ॲबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्याने आपल्या विलक्षण बौद्धिक क्षमतेच्या जोरावर इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये मानाची नोंद करून संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल येथे आयोजित विशेष समारंभात केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहळ यांच्या हस्ते विद्यार्थ्याचा गौरव करण्यात आला. पिंपरी सांडस (ता. हवेली) येथील रहिवासी अर्णव रमेश वायकर याने केवळ एका मिनिटात २ अंकी × २ अंकी असे तब्बल २२ गुणाकार अचूकपणे सोडवून हा विक्रम प्रस्थापित केला. अर्णव हा कोरेगाव मूळ येथे MSEB मध्ये सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत असलेले रमेश वायकर यांचा मुलगा आहे. अर्णवने ही उल्लेखनीय कामगिरी NiBM चे संस्थापक व मुख्य संचालक श्री. नवनाथ हंबीर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली साध्य केली.

## बारामती आगारात चालक दिन व राष्ट्रीय प्रवासी दिन संपन्न

बारामती (दै. संध्या)

बारामती आगार, प्रादेशिक परिवहन विभाग बारामती व अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने रथसप्तमी प्रवासी दिन व चालक दिन बारामती एस.टी. आगार आयोजित करण्यात आला.

यावेळी विभागीय यंत्र अभियंता (चा.) पांडुरंग वाघमोडे, आगार व्यवस्थापक रविराज घोगरे,अखिल भारतीय ग्राहक पंचायत बारामती तालुका अध्यक्ष संजीव बोराटे, उपाध्यक्ष प्रशांत जगताप, बारामती बस स्थानक प्रमुख घनश्याम शिंदे,सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सुरज पाटील आदी उपस्थित होते.



या कार्यक्रमाच्या निमित्ताने विना अपघात सुरक्षित वाहतूक सेवा देणाऱ्या चालकांचा प्रशस्तिपत्रक व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रवासी दिनानिमित्त चालक, वाहक व प्रवाशांना गुलाबपुष्प व पाणी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच दिलीप सरोदे (सफाईगार) यांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी “जागरूक ग्राहक बनूया, वाहतुकीचे नियम पाळूया” या संदेशावर आधारित पथनाट्य सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

श्री. पाटील यांनी प्रवासादरम्यान वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, अतिवेग व बेदरकार वाहनचालना टाळणे याबाबत माहिती दिली. तसेच ‘राहवीर योजना’ याबाबतही मार्गदर्शन केले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे संजीव बोराटे व महेश पवार यांनी प्रवाशांचे हक्क, सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचे स्वरूप व ग्राहक संरक्षण कायदा याविषयी माहिती दिली. बारामती विभागीय यंत्र अभियंता (चा.) पांडुरंग वाघमोडे व बारामती आगार व्यवस्थापक रविराज घोगरे यांनी स्थानकातील सुरक्षा, सुविधा व बस वाहतुकीबाबत सविस्तर माहिती दिली.

## बारामतीमध्ये विषारी ताडी विक्रीचा पर्दाफाश

बारामती (दै. संध्या)

- मानवी जीवितास घातक अश्या केमिकल च्या तीस लिटर विषारी ताडीसह बारामती पोलिसांकडून दोघे अटकेत



बारामती तालुक्यातील झारगडवाडी येथे मानवी जिवाला घातक ठरणारी विषारी ताडी विक्री करणाऱ्या टोळीचा बारामती तालुका पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.या कारवाईत पोलिसांनी ३० लिटर विषारी ताडी व ताडी तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी घातक रासायनिक पावडर जप्त केली असून दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.दि. २५ जानेवारी २०२६ रोजी सायं.५ वाजण्याच्या सुमारास बारामती तालुका पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना बारामती तालुका पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,झारगडवाडी येथे एका इसमाकडून बेकायदेशीर व विषारी ताडीची विक्री सुरू आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकला.छाप्यात चिन्नया दत्तु गुत्तेदार (वय ३२, रा. झारगडवाडी) हा इसम घराच्या भिंतीच्या आडोशाला पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक बकेटमध्ये विषारी ताडी विक्री करताना आढळून आला.तपासणीदरम्यान त्याच्याकडून ३० लिटर मानवी जिवाला घातक अशी ताडी जप्त करण्यात आली.तसेच त्याच्या घराची पाहणी केली असता,एका प्लास्टिक पिशवीत साखरेसारखी दिसणारी क्लोरोहायड्रेट (Chloral Hydrate) ही अत्यंत धोकादायक रासायनिक पावडर सापडली. चौकशीत आरोपीने ही रासायनिक पावडर ताडीमध्ये मिसळून ताडी तयार करत असल्याची कबुली दिली. तसेच सदरची ताडी व रासायनिक पावडर बाबु भंडारी (रा. सणसर ता.इंदापूर) याच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले. त्यास सुद्धा ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.या कारवाईत पोलिसांनी सुमारे १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून,विषारी ताडीचा नमुना रासायनिक तपासणीसाठी पुणे येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आला आहे.उर्वरित विषारी ताडी घटनास्थळीच नष्ट करण्यात आली.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल मनोज पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी चिन्नया गुत्तेदार व बाबु भंडारी यांच्याविरुद्ध बी.एन.एस. कलम १२३ (दहा वर्षे शिक्षा) तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ख)(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास बारामती तालुका पोलीस करत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल,अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार,उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव,पोलीस उपनिरीक्षक अमोल कदम,पोलीस अमलदार मनोज पवार, सौरभ तुपे,सुरेंद्र वाघ,भारत खारतोडे,जितेंद्र शिंदे,दादा दराडे,आफ्रिन शेख यांनी केली आहे.

## भिवंडी महानगरपालिकेतर्फे प्रजासत्ताक दिन साजरा

भिवंडी (दै. संध्या)

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी महानगरपालिका अतिरीक्त आयुक्त नयना ससाणे,उप-आयुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर,मुख्य लेखा परिक्षक मयुर हिंगाणे, सहा आयुक्त (सामान्य प्रशासन) शैलेश दोंदे व सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व प्रभाग अधिकारी, सन्मा. पदाधिकारी व अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीच्या आवारात मानवंदना देण्यात आली. यावेळी संविधान उद्देशिकेचे वाचन करून, सर्व उपस्थितांना हरित शपथ, तंबाखू मुक्त भारताची शपथ देण्यात आली. सदर कार्यक्रमानंतर अतिरीक्त आयुक्त यांनी प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. यावेळी महानगरपालिका मुख्यालयात मराठी भाषा पंधरवडा निमीत्त पोवाड्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर अतिरीक्त आयुक्त यांनी जनतेला प्रजासत्ताक दिननिमीत्त शुभेच्छा संदेश दिला. प्रजासत्ताक दिननिमीत्त महानगरपालिकेच्या मुख्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, या शिबिरास महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.



## सुरेल जलसा; ‘दस्तखत’ वर्ल्ड टूरच्या भारत टप्प्यातील खास कार्यक्रम

**पुणे (दै. संध्या)**

पुणे शहराने एका भावनिक आणि आठवणींनी भरलेल्या संध्याकाळी संगीतप्रेमींना आनंदी केले, जेंव्हा गायक-गीतकार अनुव जैन यांनी त्यांच्या ‘दस्तखत’ वर्ल्ड टूरच्या भारत टप्प्यात पुण्यातील प्रेक्षकांसमोर प्रस्तुती दिली. टीम इनोव्हेशन आणि ट्रायबव्हाइब एंटरटेनमेंटने आयोजित आणि प्रचार केलेल्या, आणि पुण्यात हाऊस ऑफ मॅकडॉवेल्स सोडा यारी जॅमच्या माध्यमातून सादर केलेल्या या शोमध्ये हजारो संगीतप्रेमी आणि चाहते एकत्र आले, ज्यांनी जवळीक अनुभवत, मनाला स्पर्श करणारी लाईव्ह परफॉर्मन्स पाहिली आणि अनुव जैनच्या आतापर्यंतच्या सर्वात महत्वाकांक्षी संगीत प्रवासाची सुरुवात झाली.

अनुव जैन स्टेजवर येताच संपूर्ण वातावरण भावनिक आणि अंतर्मुख होऊन गेले. त्यांच्या साध्या आणि भावपूर्ण सादरीकरणाच्या शैलीत, त्यांनी ‘बारीशें’, ‘अलग आसमान’, ‘हुस्न’, ‘जो तुम मेरे हो’, ‘अफसोस’ आणि ‘अर्ज किया है’ यांसारखी चाहत्यांची आवडती गाणी गायली. प्रत्येक सादरीकरणावर प्रेक्षकांनी भावपूर्ण स्वरात साथ दिली, ज्यामुळे त्यांच्या संगीताशी भारतीय प्रेक्षकांचा घट्ट नातेसंबंध दिसून आला. पुण्यातील शोमध्ये साधेपणा आणि संगीतावर लक्ष केंद्रीत करणाऱ्या सादरीकरणमुळे विशेष ठरली. लाइट्स मंद होताच आणि सुरांची लहर उठताच, संपूर्ण वेन्यू प्रेम, विरह आणि उपचारांच्या कथांनी भरून गेला, ज्यामुळे चाहत्यांसाठी हा अनुभव खूप खास आणि वैयक्तिक बनला.

अनुव जैन म्हणाले, “पुणे माझ्यासाठी खूप खास ठिकाण ठरले. माझ्या संगीताला मिळालेल्या प्रेम आणि प्रामाणिक प्रतिसादामुळे माझ्यासाठी हा अनुभव अनमोल आहे. आजची संध्याकाळ अशी होती जणू आपण सर्वजण एकत्र नवीन अध्याय सुरू करत आहोत, ज्यांनी माझ्या गाण्यांसोबत प्रत्येक भावना अनुभवली आणि रात्रीला खास बनवले.”

शोवेन शाह, संस्थापक आणि सीईओ, ट्रायबव्हाइब एंटरटेनमेंट म्हणाले, “अनुव जैनची कलात्मकता भारतीय संगीताच्या स्वतंत्र आवाजाला नव्या उंचीवर घेऊन जाते. ‘दस्तखत’ या कार्यक्रमाद्वारे आम्ही एक असा अनुभव देत आहोत, जिथे प्रेक्षकांना खरा संवाद अनुभवता येईल. आम्ही अशा अनुभवांची निर्मिती करतो जिथे सर्जनशीलता आणि समुदायाचा संगम होतो, आणि या महत्त्वाच्या टप्प्याला पाठिंबा देणे हे भारतीय संगीताच्या भविष्यातील आमच्या विश्वासाचे प्रतीक आहे.”

## थोडक्यात पण महत्वाचे...

### देवखेळचा ट्रेलर प्रसिद्ध – पौराणिक कथा, गुन्हा आणि न्यायची सरमिसळ




मुंबई (दैनिक संध्या) : मराठी ZEE5 ने आज त्याच्या आगामी मराठी ओरिजनल सिरीज Devkhel (देवखेळ)चा ट्रेलर प्रदर्शित केला. कोकणातील फारशा ऐकिवात नसलेल्या लोककथांपासून प्रेरित, देवखेळ हा एक गहन मानसशास्त्रीय थरारपट आहे. जो शिमगा (होळी) सणाच्या भीतीदायक पार्श्वभूमीवर परंपरा, अंधश्रद्धा आणि गुन्हेगारी यांची सरमिसळ करतो. ही सिरीज दिनांक 30 जानेवारीपासून खास ZEE5 वर स्ट्रीम होणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील देवताली किनारपट्टीवरील गावावर आधारित, देवखेळ एका थरारक रहस्यावर आधारित आहे- दरवर्षी होळी पौर्णिमेच्या रात्री, एखाद्याचा मृत्यू होतो. हे मृत्यू न्यायाचे प्रतीक म्हणून स्थानिक पातळीवर पूजल्या जाणाऱ्या शंकासुर या पौराणिक लोककथा व्यक्तिरेखेने दिलेल्या दैवी शिक्षेची कृत्ये आहेत, असा गावकऱ्यांचा विश्वास आहे. ट्रेलरमध्ये अशा जगाची झलक दाखवण्यात आली आहे, जिथे श्रद्धा तर्कशक्तीवर मात करते. भीती ही शांततेला अधोरेखित करते आणि सत्य विधीत दडलेले असते. जेव्हा इन्स्पेक्टर विश्वास सरंजामे गावात येतो, तेव्हा तो अंधविश्वासाला स्पष्टीकरण म्हणून स्वीकारण्यास नकार देतो. ही काळजीपूर्वक लपवून केलेली हत्या असल्याचे त्याचे मत असते. त्याचा तपास सुरू करतो. या मालिकेत इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या भूमिकेत अंकुश चौधरी असून प्राजक्ता माळी, यतीन कार्येकर, अरुण नलावडे, वीणा जामकर आणि मंगेश देसाई यांच्या प्रमुख भूमिका आहेत. दिग्दर्शक चंद्रकांत लता गायकवाड पुढे म्हणाले, “देवखेळचा जन्म शंकासुर लोककथा परंपरेबद्दलच्या आकर्षणातून झाला - एक विश्वास प्रणाली जिथे न्यायाकडे संस्थात्मक नाही तर दैवी म्हणून पाहिले जाते. आघात, श्रद्धा आणि भीती ह्यामुळे मानवी मनाचे रुपांतर मिथकात कसे होऊ शकते, हा शोध ही सिरीज घेते. ही केवळ एक गुन्हेगारी कथा नाही, तर एक भावनिक आणि मानसिक प्रवास आहे. मराठी ZEE5 ने ही कथा प्रामाणिकपणे आणि निर्भयपणे सांगण्यासाठी परिपूर्ण व्यासपीठ उपलब्ध केले. प्रेक्षकांनी ती अनुभवावी यासाठी आम्ही उत्सुक आहोत.”

### जागतिक स्तरावर चमकण्यासाठी भारतीय फिगर स्केटर गौरी राय सज्ज




पुणे (दैनिक संध्या) : हरियाणाच्या 17 वर्षीय गौरी रायने लेह येथे पार पडलेल्या 2026 'खेलो इंडिया विंटर गेम्स'च्या पहिल्या टप्प्यात अत्यंत प्रभावी कामगिरी करत 'ॲडव्हान्स फिगर स्केटिंग' श्रेणीत सुवर्णपदक पटकावले. या खेळाच्या इतिहासात पहिल्यांदाच फिगर स्केटिंगचा समावेश 'खेलो इंडिया'मध्ये करण्यात आला होता. गुरुग्राममध्ये सराव करणाऱ्या गौरीने नवांग दोर्जन स्तोबदान स्टेडियमवर या क्रीडा प्रकारातील पहिले सुवर्णपदक जिंकून आपला ठसा उमटवला. गौरीचा फिगर स्केटिंगमधील प्रवास काहीसा वेगळ्या पद्धतीने सुरू झाला. सुरुवातीला ती 'रोलर स्केटर' होती, पण 2017 मध्ये गुरुग्राममधील 'ॲम्बियन्स मॉल'मध्ये फिगर स्केटिंगचे प्रात्यक्षिक पाहिल्यानंतर तिच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळाली. या खेळातील वेग आणि सुबकता यांनी ती भारावून गेली. त्यानंतर तिने 'क्वाड' आणि 'इन-लाईन' स्केटिंग सोडून फिगर स्केटिंगकडे वळण्याचा निर्णय घेतला आणि हळूहळू आपले कौशल्य विकसित केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरही तिची ओळख निर्माण होत असून, 2022 मध्ये दुबईतील 'संयुक्त अरब अमिराती फिगर स्केटिंग चॅम्पियनशिप'मध्ये तिने रौप्य पदक पटकावले आहे. याशिवाय तिने दक्षिण कोरिया, सिंगापूर, फिलिपिन्स आणि बल्गेरिया यांसारख्या देशांमधील स्पर्धांमध्येही सहभाग नोंदवला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये सूर्यनमस्कार महोत्सव उत्साहात संपन्न

**विद्यार्थ्यांच्या सहभागातून योग, आरोग्य आणि एकतेचा जागर..!**



**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व आशा किरण सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवडगाव येथे मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या महोत्सवात शालेय विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी एकत्र येत सूर्यनमस्कार सादर करून योग व उत्तम आरोग्याचा संदेश दिला.

या महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच प्राचीन भारतीय योगपरंपरेचा जागर करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी महापौर अर्पणा डोके, नगरसदस्य सुरेश भोईर, अनंत कोऱ्हाळे, उप आयुक्त पंकज पाटील,ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच शहरातील नागरिक उपस्थित होते.

योगशिक्षक निर्मल गुप्ता, आशा किरण फाऊंडेशनचे अध्यक्ष रामकृष्ण पालमकर, वर्षा पवार, अविनाश गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सूर्यनमस्कार सादर करून शिस्त, समन्वय आणि एकतेचे दर्शन घडविले. सूर्यनमस्कार हा शरीरसामर्थ्य, लवचिकता, श्वसनशुद्धी आणि मानसिक स्थैर्य वाढविण्यास उपयुक्त असल्याचे मत यावेळी उप आयुक्त पंकज पाटील यांनी व्यक्त केले. तर नियमित सूर्यनमस्कार केल्यास तणावमुक्त जीवनशैली सहज साध्य होऊ शकते असे उप आयुक्त ममता शिंदे म्हणाल्या.

या कार्यक्रमात विविध मनपा माध्यमिक विद्यालयांनी आपला सहभाग नोंदवला. त्यामध्ये वाकड, उद्यमनगर, काळभोरनगर, केशवनगर, पिंपळे गुरव, संत तुकारामनगर, फुगेवाडी, पिंपळे सौदागर, थेरगाव, खराळवाडी, नेहरूनगर, रुपीनगर, श्रमिकनगर (निगडी), पिंपरी नगर, कासारवाडी, लांडेवाडी, किवळे, चिंचवड, चऱ्होली, पिंपळे निलख तसेच उर्दू माध्यमिक विद्यालय व त्यांच्या भाग शाळांचा सहभाग होता. क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे, क्रीडा पर्यवेक्षक अरुण कडूस तसेच विविध विद्यालयांचे मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षकही यावेळी उपस्थित होते. यावेळी संपूर्ण क्रीडांगणात सकारात्मक ऊर्जा आणि उत्साही वातावरण अनुभवायला मिळाले यावेळी स्थानिक नागरिक देखील मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

सूर्यनमस्कार महोत्सव हा पिंपरी चिंचवड शहरासाठी आरोग्य, योग आणि सामाजिक एकात्मतेचा प्रेरणादायी आदर्श ठरला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्याबाबतही जागरूकता निर्माण झाली आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व घटकांनी एकत्र येत एकाच वेळी सूर्यनमस्कार सादर करणे हे शहरातील सामाजिक सलोखा आणि शिस्तीचे उत्तम उदाहरण आहे. अशा उपक्रमांमुळे निरोगी, सशक्त आणि सकारात्मक समाज घडविण्यास निश्चितच चालना मिळेल.

**– पंकज पाटील, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक अभ्यासासोबतच योग व शारीरिक स्वास्थ्य अत्यंत महत्त्वाचे आहे. सूर्यनमस्कारासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता आणि सकारात्मक जीवनदृष्टी विकसित होते. अशा उपक्रमांमुळे निरोगी व सुसंस्कारित पिढी घडण्यास निश्चितच मदत होईल.

**– ममता शिंदे, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँककडून ‘इझी’ (EZY) लाँच

**पुणे (दै. संध्या)**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आज अपग्रेडेड मोबाइल बँकिंग आणि इंटरनेट बँकिंग प्रणाली, 'उज्जीवन ईझी' लाँच करण्याची घोषणा केली आहे. 'डिजिटल-फर्स्ट' धोरणाला बळकटी देण्याच्या दिशेने बँकेचे हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आपल्या रिटेल ग्राहकांचा विचार करून तयार केलेले, उज्जीवनची हे 'ईझी' मोबाईल आणि वेब या दोन्ही माध्यमांवर एकसंध, सुरक्षित आणि वापरण्यासाठी सोपा बँकिंग अनुभव देते. महत्त्वाचे म्हणजे ते इंग्रजी, हिंदी, कन्नड, गुजराती, मराठी, बंगाली, ओडिया, पंजाबी आणि तमिळ या नऊ भाषांमध्ये उपलब्ध आहे. या प्लॅटफॉर्मवर 200 हून अधिक बँकिंग वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत. ज्यात 90 पेक्षा जास्त नवीन क्षमतांचा समावेश आहे. दैनंदिन बँकिंग सुलभ करणे, बचत, पेमेंट,




कर्ज आणि गुंतवणुकीमध्ये अधिक सखोल सहभाग सक्षम करणे हा याचा उद्देश आहे. पुढील पिढीसाठी मायक्रोसर्व्हिसेस आर्किटेक्चरवर आधारित, EZY वेग, स्केलेबिलिटी आणि यंत्रणेची लवचिकता वाढवते, ज्यामुळे बँकेला नवीन वैशिष्ट्ये वेगाने सादर करणे आणि ग्राहकांच्या बदलत्या गरजांना अधिक प्रभावीपणे प्रतिसाद देणे शक्य होते.

## “विमा सुलभता, परवडणारे संरक्षण आणि रोजगारनिर्मितीचा नवा उपक्रम”

**पुणे (दै. संध्या)**

भारत सरकार आणि विमा नियामक यांच्या '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' या दृष्टिकोनाशी सुसंगत राहून, वनसर्कल इन्शुरन्स ब्रोकर्स प्रायव्हेट लिमिटेड 'पॉइंट ऑफ सेल्स पर्सन' (PoSP) यांचे एक नेटवर्क तयार करत आहे, ज्यांना विविध विमा उत्पादनांवर सल्ला आणि उपाय प्रदान करण्यासाठी ओळखले जाईल, प्रशिक्षित केले जाईल आणि प्रमाणित केले जाईल. 'वनसर्कल चॅम्पियन'™ म्हणून ओळखले जाणारे हे PoSP, ग्राहकांच्या दारात विमा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी, पुणे विभागापासून सुरुवात करून, शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये तैनात केले जातील.



मुंबईस्थित मुख्यालय असलेली जीवन आणि सर्वसाधारण विम्यासाठीची डायरेक्ट ब्रोकर कंपनी, वनसर्कल इन्शुरन्स ब्रोकर्स, सुरुवातीला ट्रक आणि कार विम्याच्या नूतनीकरणावर लक्ष केंद्रित करेल. वाहनांची संख्या वेगाने वाढत असल्यामुळे या क्षेत्रात विमा पोहोच आणखी वाढवता येऊ शकतो. स्थानिक व्यक्तींना ओळखून आणि त्यांना प्रशिक्षण देऊन, विविध विमा कंपन्यांकडून ग्राहकांना गरजेनुसार सल्ला आणि संबंधित पर्यायांची तुलना उपलब्ध करून देण्याद्वारे, कंपनी एक सर्वसमावेशक आणि परिणाम-केंद्रित उपक्रम तयार करण्याचे ध्येय बाळगते. ग्राहक त्यांच्या आवडीची पॉलिसी निवडू शकतात आणि वनसर्कल चॅम्पियनच्या मदतीने आपल्या मोबाईल फोनवरून थेट विमा कंपनीला प्रीमियम भरू शकतात.

विमा पॉलिसी खरेदी करताना किंवा त्याचे नूतनीकरण करताना, ग्राहकांना अनेकदा पॉलिसीच्या विविध तांत्रिक अटी आणि शर्ती समजून घेण्यासाठी वैयक्तिक सल्ल्याची आवश्यकता असते, ज्या लागू विमा प्रीमियमशी संबंधित असतात. PoSP (पॉइंट ऑफ सेल्स पर्सन) योग्य तंत्रज्ञान साधनांचा वापर करून ग्राहकांच्या दारात स्थानिक सल्ला आणि उपाय प्रदान करतो, जेणेकरून सर्वात योग्य विमा पॉलिसी निवडण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी त्रासमुक्त, कागदविरहित, सुरक्षित आणि सुरळीत अनुभव मिळेल.

## ‘अब होगा हिसाब’ या आगामी सूडनाट्यकृतीची घोषणा

**मुंबई (दै. संध्या)**

ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने ‘अब होगा हिसाब’ या आगामी मालिकेची घोषणा केली आहे. पंजाबमध्ये घडणारी ही कथा महत्त्वाकांक्षा, बंधुभाव आणि स्थलांतराच्या ओढीवर आधारित आहे. खऱ्या घटनांपासून प्रेरित असलेली ही मालिका बॉबी आणि बंटी मनोचा या दोन भावांच्या आयुष्याभोवती फिरते. एक धक्कादायक घटना त्यांच्या आयुष्याला कलाटणी देते आणि त्यांना सत्तेच्या, लालसेच्या आणि अस्तित्वाच्या संघर्षाने भरलेल्या धोकादायक जगात ओढून नेते. या प्रोमोमध्ये मालिकेच्या थरारक जगाची धडकी भरवणारी झलक




पाहायला मिळते, जिथे सूड, वर्चस्व आणि नैतिक जबाबदारीचे ओझे या भावनांचा कल्लोळ पाहायला मिळतो. या टीझरमध्ये गोल्डी सेखों या निर्दय व्यक्तिरेखेत संजय कपूर दिसतात. समोरच्याला काही कल्पना येण्याआधीच त्याच्यावर हल्ला केला पाहिजे, अशी गोल्डीची धारणा आहे. शाहीर यांनी बॉबी मनोचा ही भूमिका साकारली आहे. बॉबी मनोचा भावनिक व शारीरिक पातळीवर कधीही कडेलोट होईल, अशा पातळीवर आहे. मौनी रॉयने कामना ही भूमिका साकारली आहे. कामना अत्यंत चलाख व प्रसंगावधानता असलेली व्यक्तिरेखा आहे. तिला सत्तेची खरी किंमत काय आहे, याची जाणीव आहे. 'गुनाहों का और कर्मों का... अब होगा हिसाब' या अंगावर शहारे आणणाऱ्या ओळीभोवती गुंफलेला हा प्रोमो अशा नैतिक संघर्षाची पार्श्वभूमी तयार करतो, जिथे निष्ठा ठिसूळ आहेत, मर्यादांचे सतत उल्लंघन होते आणि भूतकाळातील प्रत्येक कर्माचा हिशेब द्यावा लागतो. ॲरे स्टुडिओ निर्मित आणि दिव्यांशु मल्होत्रा दिग्दर्शित या सीरिजमध्ये संजय कपूर, शाहीर, मौनी रॉय, अविनाश मिश्रा, निमृत कौर अहलुवालिया, हरमन सिंघा आणि अशीमा वर्दान यांनी भूमिका साकारल्या आहेत. बंधुभाव, फसवणूक आणि एका शक्तिशाली व्यवस्थेविरुद्ध उभा केलेला संघर्ष यावर आधारित या कथेला प्रत्येक कलाकाराने आपल्या अभिनयाच्या माध्यमातून भीषण वास्तव आणि भावनिक खोली प्रदान केली आहे.

## Vivo Indiaकडून Vivo X200T भारतात लाँच

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

Vivo इंडियाने आज आपला नवा प्रीमियम स्मार्टफोन Vivo X200T भारतात अधिकृतपणे लाँच केला. प्रगत ZEISS इमेजिंग तंत्रज्ञान, शक्तिशाली कामगिरी आणि दीर्घ बॅटरी आयुष्य यांचा समतोल साधणारा हा स्मार्टफोन ‘एव्हरीडे फ्लॅगशिप’ म्हणून सादर करण्यात आला आहे. दैनंदिन वापरात विश्वासार्हता, दर्जेदार कॅमेरा आणि स्मूथ सॉफ्टवेअर अनुभव शोधणाऱ्या ग्राहकांसाठी Vivo X200T खास डिझाइन करण्यात आला आहे. भारतात अचूक-अभियांत्रिकी आणि उत्पादन करण्यात आलेला Vivo X200T हा




प्रगत तंत्रज्ञान, आधुनिक डिझाइन आणि अर्थपूर्ण नवोपक्रमांप्रती Vivo ची वचनबद्धता अधोरेखित करतो. किंमत आणि वैशिष्ट्यांच्या दृष्टीने हा स्मार्टफोन आपल्या सेगमेंटमधील सर्वोत्तम मूल्य प्रस्तावांपैकी एक मानला जात आहे. Vivo X200T मध्ये ZEISS सह-अभियांत्रिकी इमेजिंग सिस्टीम देण्यात आली आहे. यात 50 मेगापिक्सेलचा ZEISS सुपर टेलिफोटो कॅमेरा असून तो 3x ते 10x झूम रेंजसाठी विशेषतः ऑप्टिमाइझ करण्यात आला आहे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**पिंपरी (दै. संध्या)**

भारताच्या प्रजासत्ताक दिनाचा ७६ वा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी उपस्थितांना तसेच शहरवासियांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

अतिरिक्त आयुक्त खोराटे म्हणाले, ‘भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीस ७७ वर्षे पूर्ण होत आहेत. हा दिवस आपल्या लोकशाही परंपरेचा, संविधानिक मूल्यांचा आणि राष्ट्रनिर्मितीच्या सातत्यपूर्ण प्रवासाचे प्रतीक आहे. या ऐतिहासिक आणि गौरवपूर्ण प्रसंगी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मी सर्व शहरवासियांना भारतीय प्रजासत्ताक



दिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देतो.’ ‘शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कटिबद्ध आहे. स्वच्छता, आरोग्य, पायाभूत सुविधा, ई-प्रशासन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील यशस्वी उपक्रमांमुळे आपले शहर देशभरात वेगळा ठसा उमटवत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना विविध सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. या विकासप्रक्रियेत नागरिकांनीही प्रशासनाला मोलाचे सहकार्य केले आहे. विशेषतः करप्रणाली अधिक सुलभ व पारदर्शक केल्यानंतर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मिळकतकर वेळेत भरला. याबद्दल सर्व करदात्यांचे मनःपूर्वक आभार. उर्वरित तिमाहीमध्ये ज्यांनी अद्याप मिळकतकर भरलेला नाही, त्यांनी तो वेळेत भरून शहराच्या विकासात आपला सहभाग नोंदवावा,’ असे आवाहन देखील अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी केले. या राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमास माजी महापौर योगेश बहल, नगरसदस्य मंदार देशपांडे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, आशा सूर्यवंशी, मधुरा शिंदे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, नगरसचिव मुकेश कोळप, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, अनिल भालसाखळे, उपआयुक्त अण्णा बोदडे, पंकज पाटील, डॉ. प्रदीप ठेंगल, संदीप खोत, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, अग्निशमन अधिकारी ऋषिकेश चिपाडे, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजुर्डे यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख, सामाजिक कार्यकर्ते, कर्मचारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

### महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२६ नुकतीच पार पडली आहे. या निवडणुकीचे कामकाज उत्कृष्टपणे व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडणाऱ्या महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्या हस्ते करण्यात आला.

### रक्तदान शिबिराचेही उद्घाटन

प्रजासत्ताक दिनानिमित्त महापालिकेच्या वैद्यकीय विभाग व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय रक्तकेंद्र यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. या रक्तदान शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## कॉर्पोरेट फुटबॉल लीग आणि स्टुडंट फुटबॉल लीगचे यशस्वी आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : साईबालाजी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी कॉर्पोरेट फुटबॉल लीग आणि स्टुडंट फुटबॉल लीग या दोन महत्त्वपूर्ण फुटबॉल स्पर्धांचे अत्यंत यशस्वी आयोजन २३ जानेवारी ते २६ जानेवारी २०२६ दरम्यान करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसह कॉर्पोरेट क्षेत्रातील सहभागी खेळाडूंमध्ये क्रीडावृत्ती, संघभावना, शिस्त आणि नेतृत्वगुणांचा विकास घडवून आणणे हा या स्पर्धांचा मुख्य उद्देश होता.तसेच या स्पर्धा मागील १० वर्षापासून यशस्वीरित्या आयोजित केल्या जात आहेत. कॉर्पोरेट फुटबॉल लीग मध्ये विविध १६ नामांकित कॉर्पोरेट संस्थांतील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेमुळे व्यावसायिक जीवनातील ताणतणावातून मुक्तता मिळण्यासोबतच आरोग्यदायी व सक्रिय जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. त्याचप्रमाणे, स्टुडंट फुटबॉल लीग मध्ये ५०० हुन अधिक विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपली क्रीडा कौशल्ये, चिकाटी आणि संघभावना प्रभावीपणे सादर केली. स्पर्धेच्या संपूर्ण कालावधीत खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. चुरशीचे सामने, शिस्तबद्ध खेळ आणि खेळाडूवृत्ती यामुळे संपूर्ण स्पर्धेला विशेष रंगत प्राप्त झाली.



## चाकण - शिक्रापूर रस्त्यावर वाहतूक कोंडी

चाकण (दैनिक संध्या) : वाढते औद्योगिकीकरण व अरुंद रस्ते यामुळे चाकण - शिक्रापूर रस्त्यावर नित्याची वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. या मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून भीषण वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली असून, दररोज वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागत आहेत. या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका शाळकरी मुले, नोकरदार वर्ग व स्थानिक नागरिकांना बसत आहे. या मार्गावरील रस्ता अत्यंत अरुंद असून, त्यावरून सातत्याने अवजड वाहने, कंटेनर व ट्रकची वाहतूक सुरू असते. त्यामुळे दोन वाहने समोरासमोर आल्यास वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. अनेकवेळा वाहन चालकांना तासनतास रस्त्यावर अडकून पडावे लागत आहे. शाळकरी विद्यार्थ्यांना वेळेत शाळेत पोहोचणे कठीण झाले आहे. यावर उपाययोजना करण्याची मागणी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांनी केली आहे. चाकण - शिक्रापूर रस्त्यावर काही ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, अपघात वाढले आहेत. ओव्हरटेक च्या प्रयत्नात या रस्त्यावर दररोज एक तरी अपघात घडतोच. या रस्त्यावर अनेकांचे नाहक बळी गेले असून, रस्ते कंपनी व प्रशासन नेमकं काय करते, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

"अवजड वाहनांच्या वेळेवर निर्बंध घालणे अपेक्षित असून भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेता प्रशासनाने तातडीने रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेऊन ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे."

**- डॉ. दत्तात्रय खांडेभराड, उद्योजक, कडाचीवाडी**

## जयाद्रीच्या तज्ज्ञ संचालकपदी माऊली उबाळे बिनविरोध

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी येथील जयाद्री विविध कार्यकारी सोसायटीच्या तज्ज्ञ संचालकपदी माऊली ऊर्फ ज्ञानेश्वर उबाळे यांची बिनविरोध निवड झाली. सोसायटीच्या संचालकांच्या झालेल्या बैठकीमध्ये उबाळे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड करण्यात आली. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष बाळासाहेब झगडे, उपाध्यक्षा रजनी पेशवे, सचिव अजित जमदाडे, संचालक संपत कोळेकर, हनुमंत खोमणे, संतोष उबाळे, गफूर बागवान, रत्नमाला झगडे, अशोक गायकवाड, अनिल झगडे आदी उपस्थित होते. सुमारे ८० वर्षांहून अधिक काळ शेतकऱ्यांसाठी कार्यरत असलेल्या 'जयाद्री'चे ११०६ सभासद आहे. आतापर्यंत सुमारे ६०० सभासदांना पाच कोटी ५० लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. पुढील काळात शेतकऱ्यांच्या पीककर्ज व शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे उबाळे यांनी सांगितले.

# सीमेवर सैनिकांचा पहारा, गावात लोकशाहीसाठी ग्रामस्थांचा लढा

### मतदानासाठी पैसा न घेण्याचा पिंगोरी ग्रामस्थांचा ऐतिहासिक निर्णय



नीरा (दै. संध्या)

"तुम्ही देशासाठी सीमेवर लढा, आम्ही लोकशाहीच्या रक्षणासाठी गावात लढा देऊ" या ठाम भूमिकेसह पुरंदर तालुक्यातील पिंगोरी गावाने लोकशाहीसाठी एक आदर्शवत निर्णय घेतला आहे. देशातील कोणत्याही निवडणुकीत मतदानासाठी पैसा किंवा कोणतेही आमिष स्वीकारायचे नाही, असा निर्णय पिंगोरी ग्रामस्थांनी प्रजासत्ताक दिनी (26 जानेवारी) सर्वानुमते घेतला आहे.

पिंगोरी गाव 'सैनिकांचे गाव' म्हणून ओळखले जाते. शिंदे सरदारांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या या गावातील दोन जवानांनी देशसेवेत बलिदान दिले आहे, तर अनेक जवान सध्या सीमेवर सेवा बजावत आहेत. अशा गावाने लोकशाहीच्या रक्षणासाठी घेतलेला हा निर्णय संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेत आहे.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून भारतीय सैन्यात शहीद झालेल्या जवानांच्या स्मृती जतन करण्यासाठी आणि सेवेत असलेल्या सैनिकांचा गौरव वाढवण्यासाठी गावाच्या वेशीवर उभारण्यात येणाऱ्या स्वागत कमानीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. सेवानिवृत्त सैनिकांच्या हस्ते, तसेच वीरपत्नी नंदा रमेश शिंदे व वीरपत्नी छाया शंकर शिंदे यांच्या उपस्थितीत हा शुभारंभ पार पडला. यावेळी गावातील अनेक माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बाबासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेवर सखोल चर्चा झाली. "आम्ही सीमेवर देशाचे रक्षण करतो, पण पैसे घेऊन मतदान झालं तर देश चुकीच्या लोकांच्या हातात जातो. चांगले लोक निवडून यायचे असतील तर निवडणुकीतील पैशांचा बाजार बंद झाला पाहिजे. तेव्हाच लोकशाही टिकेल," अशी स्पष्ट भावना सैनिकांनी व्यक्त केली.

सध्या सुरू असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतील आर्थिक देवाण-घेवाणीवरही चर्चा झाली. अखेर यापुढे कोणत्याही निवडणुकीत कोणत्याही उमेदवाराकडून पैसा, जेवणावळ, मटन पार्टी किंवा अन्य प्रलोभने स्वीकारायची नाहीत, असा ठाम निर्णय ग्रामस्थांनी घेतला.

यावेळी बोलताना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बाबासाहेब शिंदे म्हणाले की, "सैनिक जर सीमेवर देशाचे रक्षण करत असतील, तर आपण सर्वजण मिळून आपल्या गावातून लोकशाहीचे रक्षण करूया,". या निर्णयाला सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांनी व ग्रामस्थांनी एकमुखी पाठिंबा दिला. या वेळी सरपंच संदीप यादव, उपसरपंच भाग्यश्री शिंदे,पोलिस पाटील राहुल शिंदे माजी सरपंच जीवन शिंदे, प्रकाश शिंदे, निलेश शिंदे, धनंजय शिंदे, दत्तात्रय शिंदे, दिनेश भोसले, माजी सैनिक रामदास शिंदे, मंगेश शिंदे, विशाल गायकवाड, लक्ष्मण कदम, अजय शिंदे, रणजीत शिंदे, सचिन शिंदे, तेजस शिंदे, अमोल शिंदे, माजी उपसरपंच हरिश्चंद्र यादव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकशाहीसाठी आदर्श पाऊल

पिंगोरी ग्रामस्थांनी घेतलेला हा निर्णय लोकशाही बळकट करणारा असून इतर गावांसाठीही तो प्रेरणादायी ठरणार आहे. 'मतदान विक्रीला नाही' हा संदेश देत पिंगोरीने लोकशाहीच्या रक्षणासाठी एक नवा आदर्श घालून दिला आहे.

"पूर्वी पैशांच्या जोरावर निवडणुका होत नव्हत्या. आता गुन्हेगारही निवडून येतात. गावाने घेतलेला हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे."

**- हरिश्चंद्र यादव (माजी सरपंच, पिंगोरी)**

हा निर्णय आम्हाला १०० टक्के मान्य आहे. आम्ही स्वतः मतदान करू आणि इतरांनाही जागरूक करू. आमचं मत आम्ही विकणार नाही."

**- सतीश शिंदे (स्थानिक ग्रामस्थ)**

## "मन जिंकलं तर जीवन जिंकलं; सरश्री यांचा जीवनमंत्र"

पुणे (दै. संध्या)

- " मन, बुद्धी आणि देह यांचा समन्वय म्हणजे जीवनाचा विजयी डाव" - सरश्री
- "थकलो म्हणणाऱ्यांसाठी नवा मंत्र; उठ, जागा हो, शतकी खेळी कर !"- सरश्री



२५ जानेवारी रोजी हॅपी थॉट्स डेच्या निमित्ताने तेजज्ञान फाउंडेशनतर्फे पुणे येथील मनन ज्ञान ध्यान केंद्र येथे आध्यात्मिक मार्गदर्शक सरश्री यांचे प्रेरणादायी प्रवचन उत्साहात पार पडले. "जीवनाच्या क्रिकेटमध्ये शतकी खेळी करून एक उत्कृष्ट डाव कसा रचायचा" या विषयावर त्यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण समाजमाध्यमांवर करण्यात आले होते. जगभरातील असंख्य श्रोत्यांनी या सत्राचा लाभ घेतला.


'शतकी खेळी' म्हणजे केवळ शंभर वर्षे जगणे नव्हे, तर दररोज स्वतःचा विकास साधत चेतनेच्या उच्च पातळीवर जीवन व्यतीत करणे होय, असे सरश्री यांनी स्पष्ट केले. समाजमान्यता व चुकीच्या धारणांमुळे आपण स्वतःला ज्या चौकटीत अडकवतो, त्यातून बाहेर पडून स्वतःच्या क्षमता ओळखणे अत्यावश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. माणूस त्याच्या संपूर्ण क्षमतेपैकी केवळ चाळीस टक्के क्षमताच वापरतो आणि 'मी थकलो' असे म्हणत पुढील वाटचाल थांबवतो, ही मानसिक अडचण असल्याचे त्यांनी नमूद केले. "स्वतःला बेडूक समजून जगाल, तर कूपमंडूक वृत्तीने विहिरीतच जीवन जाईल," असा इशारा देत त्यांनी शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. शिस्त ही पिंजरा नसून पिंजऱ्याची चावी आहे. सूर्यासारखे विचार ठेवल्यास मायेच्या बॉलवर सिक्सर मारता येतो, म्हणजेच प्रत्येक आव्हानात्मक प्रसंगाला पूर्ण क्षमतेने सामोरे जाता येते, असा संदेश त्यांनी दिला. क्रिकेटमधील ग्लोव्हज, स्टम्प, पिच आणि क्रीझ यांची उदाहरणे देत त्यांनी देह, इंद्रिये, मन व बुद्धी यांचा सुंदर समन्वय साधला. कर्मयोग, ध्यानयोग व क्षमासाधनेचे महत्त्व विशद करत श्रोत्यांकडून छोट्या ध्यानाचा व क्षमासाधनेचा प्रत्यक्ष सरावही करून घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजज्ञान फाउंडेशनच्या कार्यकारी विश्वस्त तेजविद्या यांनी केले.

समाजमनात शुभ विचारांची क्रांती घडविण्याच्या उद्देशाने सरश्री यांनी २६ वर्षांपूर्वी तेजज्ञान फाउंडेशनची स्थापना केली असून मनन आश्रम, पुणे येथे विविध शिबिरांचे सातत्याने आयोजन केले जाते. 'महाआसमानी – द मॅजिक ऑफ अवेकनिंग' हे संस्थेचे प्रमुख शिबीर म्हणून ओळखले जाते.

## मोठ्या पडद्यावर उलगडणार नारीसामर्थ्याची गाथा !

पुणे (दै. संध्या)

प्रत्येक स्त्रीतील मर्दिनीला जागं करणारा बहुप्रतीक्षित मराठी चित्रपट 'मर्दिनी' आता प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. नारीशक्तीचा प्रभावी आणि प्रेरणादायी आविष्कार असलेला हा सिनेमा ३ जुलै २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. सिनेमाच्या या नव्या पोस्टर मध्ये एक ठाम पाऊल, उग्र रूप आणि ज्वालांनी वेढलेलं नाव 'मर्दिनी' पाहायला मिळतं. सामान्य चौकटी मोडत, स्त्रीच्या संयम, संघर्ष आणि आत्मबळाचा ठसा उमटवणारा 'मर्दिनी' भावनांना स्पर्श करणारा आणि मनाला प्रश्न विचारायला लावणारा अनुभव देईल असा दिसतोय. प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले यांसारख्या




- श्रेयस तळपदे प्रस्तुत, ॲफ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. आणि ओ डी आय ग्रुप निर्मित 'मर्दिनी' ३ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित !

प्रमुख कलाकारांच्या सशक्त अभिनयासोबत बालकलाकार मायरा वैकुळ हिची भूमिका कथेला एक वेगळी भावनिक उंची देते.

## जिल्हा परिषद माळेगाव कॉलनी शाळेत राष्ट्रध्वजास मानवंदना



बारामती (दै. संध्या)

भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळेगाव कॉलनी शाळेत हेमलता तावरे (मोटर वाहन निरीक्षक), अश्विनी सातव (नगरसेविका) यांनी राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.यावेळी राजेंद्र नाना सोनवणे (नगरसेवक), कांताभाऊ काळे (उद्योजक), जमदाडे मेजर,कृष्णमुर्ती जगताप (शाळा समिती अध्यक्ष), गजानन सरगर (मुख्याध्यापक), शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी,ग्रामस्थ,पालक व विद्यार्थी उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांचा सन्मान करून पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त कवायत व भाषण सादर करून उपस्थितांची मने जिंकली.शाळा व विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारे शालेय साहित्य कांताभाऊ काळे यांनी दिल्याबद्दल सरगर सर (मुख्याध्यापक) व कृष्णमुर्ती जगताप (अध्यक्ष-शाळा व्यवस्थापन समिती) यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

## जागतिक दर्जाच्या चित्रांचे प्रदर्शन पाहण्याची पुणेकरांना सुवर्णसंधी

पुणे (दै. संध्या)

- उत्कृष्ट कला चित्रांचे प्रदर्शन पाहण्याची पुणेकरांना पर्वणी
- १३० विद्यार्थ्यांचे दर्जेदार चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन १ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार



विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शैला प्रदीप सिन्नरकर यांच्या रेग्युलर ड्रॉईंग क्लासेस' मधील विध्यार्थ्यांच्या चित्रांच्या प्रदर्शनाचे आयोजन बालगंधर्व कलादालन येथे रविवार १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता ,प्रसिद्ध चित्रकार श्री . शेखर साने यांच्या हस्ते उद्घाटन मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून प्रोफेसर. डॉ. प्रणिता रानडे ( डेप्युटी डायरेक्टर. सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन) उपस्थित राहणार आहेत.

सदरील प्रदर्शन पुणेकरांसाठी विनामूल्य पाहता येणार आहे. या वर्षी प्रदर्शनात १३० विध्यार्थी सहभागी झाले आहेत. सामजिक जीवनाचे आपण एक घटक आहोत आणि पर्यावरण वाचवणे ही आपली जबाबदारी आहे हे सांगणारे पाणी वाचवा, पृथ्वी वाचवा, सेव्ह द टायगर, सोशल मीडिया, व्यसनांबद्दल जागरूकता, आपल्या भारतीय सैन्याचा अभिमान, झाडे वाचवा असा सामाजिक संदेश देणारी चित्रे प्रदर्शनात असून त्याबरोबर पोट्रेट, कॅनव्हॉस् पेटिंग, कॉफी पेटिंग, म्यूरल्स, निसर्ग चित्र, पेन्सिल शेडिंग, स्थिर चित्रे अशा वेगवेगळ्या विषयांवरील चित्रे प्रदर्शनात असणार आहेत.

सौ. शैला सिन्नरकर यांनी (ए. टी. डी / जी. डी. आर्ट ) डिप्लोमा अभिनव कला महाविद्यालय पुणे येथून केले आहेत. गेली २५ वर्षे त्या मॉडेल कॉलनी हॉल व सेनापती बापट रोड पुणे येथे. ड्रॉईंग क्लासेस व म्युरल्स, कॅनव्हॉस पेटिंग, पेपर मॅशे, कॉफी पेटिंग, पॉट मेकिंग, इको फ्रेंडली गणपती इ. कार्यशाळा घेत आहेत. लहान मुले ही आपल्या देशाची भावी पिढी आहे. ती कलेच्या क्षेत्रात कुठेही मागे राहू नये व त्यांना कलेबद्दल आवड निर्माण व्हावी व क्लासला येणाऱ्या विध्यार्थ्यांच्या कलागुणांना उत्तेजन देऊन त्यांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने बालगंधर्व कलादालन येथे चित्रप्रदर्शन भरविण्यात येते. अशी माहिती शैला सिन्नरकर यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

# अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे भव्य लोकार्पण संपन्न

### पिंपरी चिंचवड शहराच्या न्यायव्यवस्थेत ऐतिहासिक पर्व

"जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता. आज तो प्रत्यक्षात उतरला, हे पिंपरी चिंचवडच्या न्यायव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे. हे न्यायालय शहराच्या वाढत्या गरजांना पूरक असून न्यायदान अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख होण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल. आज झालेले उद्घाटन हे न्यायव्यवस्थेमधील मैलाचा दगड ठरेल."

**– ॲड. उमेश राम खंदारे (सचिव, पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन)**



पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड शहराच्या न्यायालयीन इतिहासात आजचा दिवस ऐतिहासिक व अभिमानास्पद ठरला. शहराला दीर्घ प्रतीक्षेनंतर स्वतःचे हक्काचे "जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय" मोरवाडी येथील जुनी न्यायालयीन इमारत येथे अत्यंत सन्माननीय वातावरणात व मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते झाडाच्या रोपाला पाणी घालून करण्यात आली.

या न्यायालयाचे लोकार्पण मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती श्री. संदीप मारणे साहेब व मा. न्यायमूर्ती श्री. आरिफ डॉक्टर साहेब यांच्या शुभहस्ते तर पुणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. श्री. एम. के. महाजन साहेब व पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.गौरव वाळुंज यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या वेळी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे चेअरमन ॲड. हर्षद निंबाळकर, सदस्य ॲड. उदय वारंजीकर, ॲड. राजेंद्र उमाप, ॲड. अहमद खान पठाण, ॲड. विठ्ठल कोंडे देशमुख यांच्यासोबत बारचे माजी अध्यक्ष व पदाधिकारी त्याचबरोबर न्यायव्यवस्थेतील मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक, व्यापारी व लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वाच्या शहरासाठी स्वतंत्र अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची आवश्यकता अनेक वर्षांपासून प्रकर्षाने जाणवत होती. आज या न्यायालयाच्या लोकार्पणामुळे शहरातील न्यायप्रक्रिया अधिक जलद, सुलभ, परिणामकारक व लोकाभिमुख होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या सत्र न्यायालयामुळे आता नागरिकांना न्यायासाठी पुणे येथील न्यायालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही. त्यामुळे वेळेची बचत, आर्थिक दिलासा आणि मानसिक ताणात घट होऊन सर्वसामान्य नागरिकांना वेळेत न्याय मिळण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच वकील वर्ग व न्यायालयीन कर्मचारी यांच्यासाठीही कामकाज अधिक सुसूत्र, कार्यक्षम आणि सुव्यवस्थित होणार आहे.

"पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे शहरीकरण आणि प्रकरणांची वाढती संख्या लक्षात घेता, भविष्यात स्वतंत्र मोटर वाहन न्यायालय व कौटुंबिक न्यायालय स्थापन होणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि विशेषीकृत न्याय मिळू शकेल. या गरजेचा गांभीर्याने विचार करण्यात येत असून, त्याबाबत लवकरच सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे मत मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. संदीप मारणे यांनी व्यक्त केले."

पिंपरी चिंचवड शहर हे राज्यातील अग्रगण्य औद्योगिक शहरांपैकी एक असून येथे औद्योगिक, दिवाणी, फौजदारी तसेच श्रमविषयक प्रकरणांची संख्या सातत्याने वाढत आहे. परिणामी न्यायालयीन कामकाजावर मोठा ताण निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची आज झालेली स्थापना न्यायदान प्रक्रियेला नवी गती देणारी ठरणार असून, न्यायव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणारी ठरेल. मोरवाडी येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात जिल्हा न्यायाधीश म्हणून श्रीमती एस.एस. नायर साहेब तर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर म्हणून श्री डोंगरे साहेब यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

ही केवळ प्रशासकीय घटना नसून, पिंपरी चिंचवड शहराच्या न्यायालयीन हक्काचा विजय आहे. या न्यायालयाच्या स्थापनेसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे शहरातील लोकप्रतिनिधी, पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य, पोलीस प्रशासन, वकील बंधू-भगिनी तसेच जागरूक नागरिक यांच्या सामूहिक प्रयत्नातूनच हा ऐतिहासिक टप्पा साकार झाला आहे.

त्याचबरोबर बारचे अध्यक्ष वाळुंज यांनी शहरातील पाचही आमदारांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले व पुणे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश श्री महाजन साहेब यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी आयुक्त शेखर सिंह यांनी केलेल्या सहकार्याबद्दल विशेष कौतुक व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन न्यायालयीन अधिकाऱ्यांसमवेत पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.गौरव वाळुंज, उपाध्यक्ष ॲड. अनिल पवार, सचिव ॲड.उमेश खंदारे, महिला सचिव ॲड.रिना मगदुम, ॲड. शंकर घंगाळे, सदस्य ॲड. संकेत सरोदे, सदस्य ॲड.विकास शर्मा, ॲड. मानसी उदासी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन न्यायाधीश महाडिक साहेब, औटी साहेब यांनी केले तर नव्याने पदभार स्विकारलेल्या जिल्हा अतिरिक्त व सत्र न्यायाधीश श्रीमती. एस.एस. नायर यांनी आभार व्यक्त केले.